# पंढरी संचार

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | वर्ष २९ | अंक - २४०

पंढरपूर | सोमवार, २० जानेवारी २०२५ | किंमत ₹ ४ | पाने : ८

NO PAIDNEWS




चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्यांना अटक PII




सुर्य घर योजनेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे- जिल्हाधिकारी PIII

## आरोग्य विभागाच्या जाळ्यात सापडला

# बोगस डॉक्टर

## ‘पंढरी संचार’ बातमीचा इफेक्ट



20 पथके तैनात

पंढरपूरातील १७० खासगी रुग्णालयाची तपासणी सुरू



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** राज्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झाला असल्याने आरोग्य विभागाने बोगस डॉक्टर शोध मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेमध्ये पंढरपूर शहरात एक बोगस डॉक्टर आढळून आला आहे. आरोग्य विभागाने त्याच्यावर कारवाई केली आहे. या घटनेमुळे पंढरपूर तालुक्यात खळबळ उडाली आहे.

कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना राज्यात अनेक बोगस डॉक्टर रुग्णांवर उपचार करतात. यामुळे रुग्णाच्या जीवितास धोका निर्माण होतो. तसेच अनेक रुग्णालयात रुग्णांकडून जास्त फी घेतली जाते व सोयी सुविधा दिल्या जात नाहीत. यामुळे याची पाहणी करण्यासाठी आरोग्य मंत्री यांनी राज्यात बोगस डॉक्टर शोधमोहीम व रुग्णालयाची तपासणी मोहीम राबविण्याचे आदेश दिले. त्यानुसार राज्यात ही मोहिम सुरू करण्यात आली आहे. पंढरपूर शहर व तालुक्यात 170 रुग्णालय आहेत. या रुग्णालयाची तपासणी व बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यात येत आहे. यासाठी 20 पथके सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर महेश सुडके व तालुका वैद्यकीय अधिकारी एकनाथ बोधले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत.

शनिवारी या पथकाला पंढरपूर अकलूज जुना रोडवर नारायणदेव बाबा मठामध्ये एक बोगस डॉक्टर रुग्णांवर उपचार करत असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार वैद्यकीय पथक तेथे दाखल झाले. यावेळी तेथे अनेक रुग्णांवर डॉक्टर दत्तात्रय पवार हे उपचार करत असल्याचे दिसून आले. यामुळे या पथकाने पवार यांच्याकडे वैद्यकीय प्रमाणपत्राची मागणी केली. तेंव्हा पवार यांनी मी दहावी पास असून माझ्याकडे कोणतीही वैद्यकीय प्रमाणपत्रे नाहीत. विविध आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांवर आपण थेरपी द्वारे उपचार करत असल्याचे सांगितले. हा उपचार परंपरागत सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर वैद्यकीय पथकाने दत्तात्रय पवार यांच्यावर कारवाई केली असून रुग्णावर करण्यात येत असलेले उपचार बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

या मठात अंग दुखी, पाठ दुखी अशा वेगवेगळ्या रोगावर उपचार करण्यासाठी अनेक रुग्ण येत असल्याचे दिसून आले आहे. गेल्या तीन वर्षापासून या मठात पवार उपचार करत आहेत. एका रुग्णांकडून उपचारासाठी पाचशे रुपये घेण्यात येत आहेत. आरोग्य विभागाने बोगस डॉक्टरचा शोध लावल्यामुळे पंढरपूर शहर व तालुक्यात खळबळ उडाली आहे.


## At a Glance

### लाभार्थ्यांना प्रॉपर्टी कार्डचे वितरण



**अक्कलकोट :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील स्वामित्व योजनेंतर्गत देशभरातील 50 हजारांहून अधिक गावांतील 58 लाखांहून अधिक नागरिकांना प्रॉपर्टी कार्डचे वितरण केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर आदरणीय नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांशी संवाद कार्यक्रमाचे देशभरात आयोजन करण्यात आले होते. यावेळी सोलापूर येथे आमदार सचिन कल्याण शेट्टी अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला उपस्थित होतो.

### अग्निशमन कामगारांचा २० महिन्यांचा पगार रखडला



**बार्शी :** बार्शी नगरपालिका हद्दीत जीवाची बाजी लावून नागरिकांचे प्राण वाचवणाऱ्या अग्निशमन दलाच्या कंत्राटी कामगारांना गेल्या १८ ते २० महिन्यांपासून पगार मिळालेला नाही. आर्थिक विवंचनेत सापडलेल्या या कामगारांचे कुटुंब उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. पगाराशिवाय काम करणाऱ्या या कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे. कुटुंब चालवण्यासाठी त्यांना कर्ज घेण्याची वेळ येत असून, अनेक जण वैफल्यग्रस्त झाले आहेत. पगाराविना काम करताना देखील त्यांची नोकरी कायमची जाण्याची भीती आहे.

### स्पर्धा परीक्षार्थ्यांसाठी मोठी मागणी



**बार्शी :** महाराष्ट्र गट-ब व गट-क (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा 2024 संदर्भातील जाहिरातीमध्ये अत्यल्प पदसंख्या ठेवण्यात आल्याने स्पर्धा परीक्षार्थ्यांमध्ये नाराजी आहे. या पार्श्वभूमीवर बार्शीचे आमदार ॲड. दिलीप सोपल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि सामान्य प्रशासन विभागाचे अप्पर मुख्य सचिव नितीन गद्रे यांना विनंतीपत्र पाठवले आहे. या पत्रात त्यांनी विद्यार्थ्यांच्या मागणीकडे तातडीने लक्ष घालून पदसंख्येत वाढ करण्याची मागणी केली आहे.

### लाडकी बहीण योजना बंद होणार

**सोलापूर :** आता संजय गांधी निराधार योजना बंद झाली आहे आणि मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनाही बंद होणार आहे. लाडक्या बहीण योजनेमुळे तुम्ही त्यांना मतदान केलं. मात्र, आता लाडकी बहिणही सावत्र झाली आहे, असा दावा सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी केला आहे. काँग्रेसचे सरकार होते, तेंव्हा विडी कामगारांचे कारखाने वाचले, कामगारांना पेन्शन मिळत होती. सिलिंडर फक्त 800 रुपयाला होतं. आता संजय गांधी निराधार योजना बंद झाली आणि लाडकी बहीण योजना पण बंद होणार आहे.

## माजी आमदारासह २३ जणांवर गुन्हा दाखल

### जिल्हा बँकेची 11 कोटी 44 लाख रुपयाची फसवणूक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा आर्थिक राजवाडा असलेल्या सोलापूर जिल्हा सहकारी बँकेची ११ कोटी ४४ लाख रुपयाची फसवणूक केली. याप्रकरणी माजी आमदार दीपक आबा साळुंखे यांच्यासह 23 जणांवर सांगोला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

सन २०११ मध्ये सांगोला साखर कारखान्याने जिल्हा बँकेकडे कर्जाची मागणी केली होती. त्यानुसार बँकेने कारखान्याला 50 लाख रुपयाचे कर्ज मंजूर केले होते. या बदल्यात कारण म्हणून कारखान्यातील साखर ठेवण्यात आली होती. बँकेच्या परवानगीशिवाय साखर विकण्यास मनाई करण्यात आली होती. मात्र कारखान्याचे चेअरमन माजी आमदार दीपक आबा साळुंखे व संचालक मंडळाने बँकेची फसवणूक करून परस्पर साखरेची विक्री करून रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी वापर केली. याची माहिती बँकेला कळताच बँकेने सांगोला पोलीस ठाण्यात दीपकआबा साळुंखे व २३ संचालक मंडळांनी ११ कोटी ४४ लाख रुपयांची फसवणूक केली म्हणून गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये शिवसेना ठाकरे गट, शिवसेना शिंदे गट, भाजप, शेकाप या पक्षाचे मातब्बर नेते यांच्यावर गुन्हा दाखल झाला असल्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर दीपकआबा साळुंखे यांनी जिल्हा बँकेकडून कोट्यावधी रुपयाचे कर्ज घेतले असल्याचे उघड झाले होते. मात्र याचा इन्कार दीपकआबा साळुंखे यांनी केला होता. सांगोला विधानसभा मतदार संघात दीपकआबा साळुंखे » पान ३ वर



### सोलापूरच्या पालकमंत्रीपदी जयकुमार गोरे यांची नियुक्ती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** राज्य शासनाने शनिवारी रात्री उशिरा पालकमंत्र्यांची नावे जाहीर केली असून सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गोरे सातारा जिल्ह्यातील माण - खटावचे भारतीय जनता पार्टीचे आमदार आहेत. ते तिसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आले आहेत. त्यांच्या नियुक्तीने भाजप समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## जनावरांच्या खरेदी विक्रीतून दररोज ८० लाखांपेक्षा अधिक रकमेची उलाढाल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर यात्रेनिमित्त विजापूर रोडवरील सोरेगांव येथील सिध्देश्वर देवस्थानाच्या 20 एकर जागेवर जनावर बाजार भरवण्यात आला आहे. हे जनावर बाजार फुलले असून, या होत आहे.

दरवर्षी श्री रेवणसिध्देश्वर मंदिर परिसरात भरविण्यात येणारे जनावर बाजार यंदा प्रथमच सोरेगांव येथे भरविण्यात आल्याने या बाजारासाठी प्रशस्त जागा उपलब्ध झाली आहे.

दररोज 150 हून अधिक जनावरांची खरेदी - विक्री होत असल्याचे दिसून येते. एक म्हैस किमान 50 ते 80 हजारांत विकली जात आहे. जाफराबादी म्हशीचे दर दीड लाख रुपयांच्या पुढे आहेत. दिवसांतून सूमारे 80 लाखांहून अधिक उलाढाल होत आहे.

कर्नाटक व आंध्र प्रदेशात मोठे डेअरी फार्म असून तिथे येथून म्हशी नेल्या जातात. देशी गायी, वळू, जाफराबादी म्हैस आदी जनावरे दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, इंडी, चडचण, मोहोळ, माढा, मंगळवेढा, कर्नाटक या भागातून विक्रीसाठी आले आहेत. दरवर्षी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यातील पहिल्या मंगळवारपासून जनावर बाजार भरण्यास सुरुवात होते. परंतू यंदा महापालिकेने रेवणसिध्देश्वर मंदिराजवळील जागा उपलब्ध करुन देण्यास नकार दिल्याने एक आठवडा उशिराने जनावर बाजार सुरुवात झाली. त्यामुळे जनावर बाजार भरण्यावर परिणाम होईल असा अंदाज वर्तविला जात होता. परंतू उशिरा सुरु होऊनही जनावर बाजार फुलला आहे.

## 1 लाख 30 हजार डॉक्टर करणार मतदान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**मेडिकल कौन्सिल निवडणूक**

**पंढरपूर :** राज्यात वैद्यकीय वर्तुळात महत्त्वाच्या असलेल्या महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची निवडणूक ३ एप्रिल रोजी होणार आहे या निवडणुकीसाठी राज्यातील १ लाख ३० हजार डॉक्टर मतदान करणार आहेत.

मेडिकल कौन्सिलवर एकूण १८ सदस्य आहेत. त्यापैकी ९ सदस्यांना निवडून कौन्सिलवर जावे लागते तर अन्य ९ सदस्यां पैकी ५ सदस्यांना शासनातर्फे प्रतिनिधित्व दिले जाते. ४ सदस्य हे वैद्यकीय शिक्षण विभाग सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र आरोग्य, विज्ञान विद्यापीठ आणि कॉलेज ऑफ फिजिशियन आणि सर्जन या संस्थेमार्फत या मानसीवर नियुक्त केले जातात. मेडिकल कौन्सिलची निवडणूक संदर्भात अधिसूचना जारी करण्यात आली आहे. 3 एप्रिल रोजी निवडणूक होणार आहे. यासाठी उमेदवारी अर्ज १८ फेब्रुवारीपर्यंत दाखल करण्याची मुदत देण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी राज्यातील १ लाख ३० हजार डॉक्टर मतदान करणार आहेत. यामुळे या निवडणुकीकडे राज्यातील डॉक्टरांचे लक्ष लागले आहे.

## यंदा महिनाभर पुरेल इतकेच पाणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सांगोला :** सांगोला तालुक्यातील माण व कोरडा नदीवर १९ बंधाऱ्यांवर अवलंबून असणाऱ्या १९०० ते २००० हेक्टर जमिनीसाठी एक महिना पुरेल इतकाच पाणीसाठा उरला आहे. सध्य स्थितीत रब्बी ज्वारी, मका आणि डाळिंब बागायत शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता आहे. माण व कोरडा नदीवरील बंधाऱ्यामध्ये सुमारे २८५ दलघफू इतका पाणीसाठा शिल्लक आहे. हा पाणी साठा पुढील एक महिना पुरेल इतकाच आहे. म्हणजे साधारण फेब्रुवारीनंतर कडक ऊन चालू होते. त्यामुळे पिकांना वारंवार पाणी द्यावे लागते. कूपनलिका व विहिरींच्या पाण्याची पातळी खालावली जाते.

## पाच कामांची स्वप्नपूर्ती करण्याचा आ. पाटील यांचा संकल्प

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** आपल्या कारकिर्दीमध्ये जिल्ह्यातील पाच प्रमुख प्रश्न सोडवून त्याचा एक ऐतिहासिक निकाल लावण्याचा संकल्प आज माढा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी व्यक्त केला. श्रमिक पत्रकार संघाच्या कार्यक्रमात असते बोलत होते. त्यांनी सांगितले की , उजनी धरणावर पर्यटन केंद्र करायचे आहे. दुसरे स्वप्न माढा शहराचा पाणी प्रश्न सोडवणे हे आहे. माढा शहराला कधीही पाणी कमी पडणार नाही यासाठी प्रयत्न करणार आहे. तिसरे स्वप्न मेंढापुर येथे दोन हजार एकरावर औद्योगिक वसाहत उभा राहावी, त्यामध्ये मोठे उद्योग यावेत हे असून चौथे स्वप्न करकंब, मोडनिंब, टेंभुर्णी या शहरात नगर पंचायती करणे हे आहे. आणि पाचवे स्वप्न सिना माढा सिंचन योजनेचा विस्तार करणे, नवीन योजनेस सूप्रमा मिळवणे, मानेगाव उपसा सिंचन योजना राबवणे, सीना - माढा उपसा सिंचन योजनेतील सर्व पंप नवीन टाकने, आणि सौर ऊर्जेवर चालवणे हे आहे. आपल्या कारकिर्दीमध्ये या प्रमुख प्रश्नांना प्राधान्य असल्याचे ते म्हणाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार सिद्धार्थ धवळे होते.

यावेळी पत्रकार संघाच्यावतीने आ. अभिजित पाटील यांचाही विधानसभा निवडणुकीतील विजया बद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुरेश गायकवाड, कार्याध्यक्ष गणेश गायकवाड, उपाध्यक्ष महालिंग दुधाळे, घनश्याम शिंदे, सचिव सतीश बागल, आदींसह नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान आ. अभिजित पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मनसेचे नेते शशिकांत पाटील, भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश बागल, सुधाकर कवडे, पत्रकार शिवाजी शिंदे, नवनाथ पोरे, मोहन डावरे, समाधान गायकवाड, मोहन कोळी, शहाजी काळे, सचिन शिंदे, बजरंग नागणे, सावता जाधव, बालाजी फुगारे, राजाभाऊ मिसाळ, संतोष रणदिवे आदींसह पत्रकार उपस्थित होते.

## दि.3 ते 19 जानेवारी 2025 कालावधीत सहा ठिकाणी कारवाई; चार लाख 51 हजाराचा दंडवसूल

## अवैध वाळू वाहतूकीवर महसूल प्रशासनाची कारवाई- तहसिलदार लंगुटे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल पथकाने मौजे.चिंचोली भोसे (ता.पंढरपूर) भीमा नदीपात्रात अवैध वाळू उपसा करण्यासाठी येणारा एक जेसीबी क्रमांक (क्र. एमएच 10 एस 7522) आज जप्त करण्यात आला आहे. तसेच दि. 03 ते 19 जानेवारी या कालावधीत महसूल पथकाने तालुक्यात विविध ठिकाणी अवैध वाळू वाहतूकीवर कारवाई करुन चार लाख 51 हजार 700 रुपयांचा दंड वसुल करण्यात आला असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. मौजे.चिंचोली भोसे ता.पंढरपूर येथे भीमा नदी पात्रात अवैध वाळू उत्खनन करून पळून जाताना आज एक जेसीबी जप्त करण्यात आला असून सदर वाहन शासकीय धान्य गोदाम येथे ठेवण्यात आले आहे. तसेच दि. 03 ते 19 जानेवारी2025 या कालावधीत तालुक्यात अनवली, रोपळे, गुरसाळे, ओझेवाडी, चिंचोली » पान 3 वर

## मोहिते पाटलाला सातपुते यांनी डिवचले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** खा. धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले की, “राम सातपुते पराभूत आहेत. ” हो, मी माझा पराभव स्वीकारला आहे. मी तर सामान्य घरातला कार्यकर्ता आहे. माझा पराभव थोडक्यात 13 हजारांनी झाला, पण मोहिते पाटलांचा 2009 ला पंढरपूर विधानसभेत 37 हजार मतांनी दारुण पराभव झाला होता. स्व. भारत नाना भालके यांचा हा फोटो रोज बघत जा, म्हणजे तुमची खरी लायकी लक्षात येईल. अशा आशयाची पोस्ट सोशल मीडियावर राम सातपुते यांनी केली असून मोहिते पाटलाला डिवचले आहे.

## मॅरेथॉनच्या माध्यमातून आरोग्य व समतेचा संदेश



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** पहाटेच्या उत्साहपूर्ण वातावरणात माढा तालुक्यातील डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीनं टेंभूर्णीत ‘पावनखिंड रन’चा शुभारंभ करण्यात आला. मॅरेथॉनच्या माध्यमातून आरोग्य व समतेचा संदेश देण्यात आला. या मॅरेथॉनमध्ये सर्व वयोगटातील हजारो स्पर्धक सहभागी झाले होते. यावेळी मॅरेथॉनच्या निमित्तानं आमदार अभिजीत पाटील यांनी उपस्थित स्पर्धकांशी संवाद साधला.

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर विधानसभा निवडणुकीत मतदारांनी दाखवलेल्या विश्वासाच्या जोरावर मोठा विजय मिळवता आला. या विश्वासासाठी जनतेचे आभार मानण्यासाठी भाजपाचे आमदार सुभाष देशमुख यांनी सिंदखेड येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी मतदारसंघातील प्रत्येक गावच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध असून विकासाचा प्रत्येक संकल्प पूर्णत्वास नेण्याचा विश्वास व्यक्त केला. याप्रसंगी प्रतीक घोडके यांची सीआरपीएफमध्ये आणि प्रकाश मोकाशी यांची एसआरपीएफमध्ये नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात केला.

### विविध गुणदर्शन स्पर्धांचे प्रशस्तीपत्रक वाटप व भव्य मोफत सायकल वाटप

# जिजाऊ-सावित्री यांच्यामुळेच नारीशक्तीचा सन्मान : सोनिया गोरे

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क





**माळशिरस :** राष्ट्रमाता जिजाऊ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या संयुक्त जयंती निमित्त विविध गुणदर्शन स्पर्धांचे प्रशस्तीपत्रक वाटप व भव्य मोफत सायकल वाटप बचत गटांना स्वस्त धान्य दुकान वाटप इत्यादी कार्यक्रम शिवसेनेचे नेते तथा विश्वस्त नातेपुते एज्युकेशन सोसायटी राजकुमार हीवरकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दहीगाव येथील श्री श्री ज्ञानमंदिर या संस्थेवर आयोजित करण्यात आलेला होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे दहिवडी येथील सिद्धनाथ पत संस्थेच्या संचालिका तथा मंत्री जयकुमार गोरे यांच्या पत्नी सोनिया गोरे तसेच नातेपुते पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे हे होते.


याप्रसंगी बोलताना सोनिया गोरे म्हणाल्या की, राष्ट्रमाता जिजाऊ ज्ञानज्योती सावित्रीबाई यांच्यामुळे आज येथे नारी शक्तीचा सन्मान होत आहे. सरकारने लाडकी बहीण योजना आणली तसेच प्रत्येक कुटुंबाला बहिणीला स्वावलंबी बनवायचा मानस सरकारचा आहे.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की शाळेने अध्यात्मावर भर दिलेला आहे. मुलींनी लाटी काठी चे प्रात्यक्षिक दाखवल्यानंतर त्यांनी त्यांचे कौतुक केले व म्हणाल्या माझ्या लेकी वरती कोणी अन्याय करण्याचा प्रयत्न केला तर या लेकी नक्कीच त्यांना सडेतोड उत्तर देतील. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की हिवरकर पाटील यांनी गोरगरीब मुलींना वाडीवस्तीवरून शाळेत येण्यासाठी जी पायपिट करावे लागते त्यासाठी मोफत सायकल देऊन त्यांना शैक्षणिक मार्ग सुकर केला आहे त्यांचे खूपच अभिनंदन तसेच मुलींनी शैक्षणिक तसेच खेळामध्ये विशेष प्राण्यांना प्राप्त केल्यामुळे त्यांना पारितोषिक मिळत आहे त्यांचे पालक येथे उपस्थित आहे त्यांच्या पालकांनी आपल्या मुला-मुलींकडे परिपूर्ण असे लक्ष दिले तर नक्कीच आपल्यातूनच चांगले अधिकारी निर्माण होतील असे अपेक्षा व्यक्त केली. हिवरकर पाटील यांनी स्त्रियांना मुलींना शिक्षणात मदत होण्यासाठी भव्य सायकल वाटप विविध गुणदर्शन स्पर्धा महिला बचत गटांना रेशन दुकान वाटप आणि त्याचे प्रमाणपत्र देऊन त्यांच्यामध्ये नवीन ज्योत पेटवण्याचे काम केलेल आहे असा उपक्रम सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी कार्यकर्त्यांनी राबवला पाहिजे असं मत यावेळी त्यांनी व्यक्त केलं

आपल्या मनोगतात हिवरकर पाटील म्हणाले की मुलींनी लाठी काठी खेळ हा स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आहे तसेच आपल्या घराचे संरक्षण ही यापुढे मुली नक्कीच करते. आपण दिलेल्या सायकल मुळे वाडीवस्तीवरून चालत येणाऱ्या मुलींना शिक्षणाचा मार्ग सुखकर करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच माळशिरस तालुक्यातील विविध गावातील बचत गटांना एकूण 27 रेशन दुकान दिले आहेत त्या महिलांना सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. शैक्षणिक सामाजिक राजकीय औद्योगिक क्षेत्रात महिलांची आघाडी दिसून येत आहे त्यामुळे महिला सक्षम बनत चालल्या आहेत.

यावेळी नातेपुते पोलीस स्टेशनचे महारुद्र परजणे , ऋतुजा ताई मोरे, कार्यक्रमाचे अध्यक्ष राजकुमार हिवरकर पाटील, भाजपचे मनोज जाधव ,भाजपचे तेजस गोरे, राष्ट्रवादीचे रियाज शेख, भीमराव फुले, डॉक्टर रणजीत फुले, मुख्याध्यापिका अनिता बनकर, सीमा एकतपुरे, सर्व शिक्षक स्टाफ पोपटराव शिंदे , चेअरमन रंजीत जठार , सनी बरडकर ,सतीश बरडकर, सुनील बनकर अभिजीत चांगण ,निलेश ढोपे, संग्राम हिवरकर ,विद्यार्थी पालक महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## विवाहित महिलेच्या छळ प्रकरणी पाच जणांवर गुन्हा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** विवाहित महिलेचा छळ केल्याप्रकरणी सोलापुरातील विजापूर नाका पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. कर्नाटक येथे सासरी असताना माहेरून दोन लाख रुपये घेऊन ये असा दगादा लावून विवाहित महिलेस मारहाण करून छळ केल्याप्रकरणी महिलेचा पती संतोष, सासरे सूर्यकांत ( रा. स्टेशन रोड, विजापूर ), नणंद श्रीदेवी कंगोड, विद्या बिराजदार, शोभा तडलगी ( सर्व रा. विजापूर ) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. सदर गुन्ह्यामध्ये कोणत्याही आरोपीस अटक करण्यात आली नाही. याबाबतचा अधिक तपास पोलिस करीत आहेत.

## » Selected

## कराडच्या पत्नीची बार्शीमध्ये कोट्यावधीची प्रॉपर्टी

**सोलापूर :** वाल्मिक कराडची दुसरी पत्नी ज्योती मंगल जाधव हिच्या नावे सोलापूर जिल्ह्यात देखील कोट्यावधी रुपयांची संपत्ती आहे. बार्शी तालुक्यातील शेंद्री गावातील जी जमीन ज्योती मंगल जाधव यांच्या त्या शेत जमीन आहे. शेंद्री गावात ज्योती मंगल जाधव हिच्या नावाने 4 जमिनीचे सातबारा असल्याचे ट्विट सामाजिक कार्यकर्त्यां अंजली दमानिया यांनी केले होते. बार्शीतल्या शेंद्री गावात एकूण चार शेतजमिनी ज्योती जाधवच्या नावे खरेदी करण्यात आले असून त्यांचे क्षेत्रफळ साधारण 35 एकर इतके आहे तर अंदाजे मूल्य हे सुमारे दीड कोटी रुपये इतके आहे.

## ४ हजार ८५९ नागरिकांना स्वामित्व



**सोलापूर :** सनद वाटप केंद्र सरकारच्या स्वामित्व योजने अंतर्गत आज शनिवारी संपूर्ण देशातील २४६ जिल्ह्यातील ५८ लाख लाभार्थ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आभासी पध्दतीने सनद वाटप कार्यक्रम झाला. यावेळी सोलापूर जिल्ह्यातील ३९ गावांमधील ४ हजार ८५९ स्वामित्व सनद वाटप जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आमदार सचिन कल्याणशेट्टी व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्वामित्व सनद वाटप कार्यक्रम नियोजन भवन येथील सभागृहात संपन्न झाला. यावेळी सीईओ कुलदीप जंगम, आरडीसी मनीषा कुंभार, दादासाहेब घोडके, गजानन पोळ उपस्थित होते.

## कै. विष्णुपंत रामचंद्र दादरे लोणारी यांची जयंती साजरी !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पुणे जिल्ह्यात एकमेव ठिकाणी श्री क्षेत्र देहू येथे लोणारी समाज सेवा संघातर्फे रविवार दिनांक १२/०१/२०२५ रोजी लोणारी समाजाचे भिष्म पितामह समाजरत्न कै. विष्णुपंत रामचंद्र दादरे लोणारी यांच्या ९२ वी जयंती मोठ्या उत्साहाने संपन्न झाली.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आदरणीय कै. विष्णुपंत रामचंद्र दादरे लोणारी यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलन करण्यात आले. संघातर्फे प्रमुख पाहुण्यांचा विठ्ठल खिलारी ( लोणारी ) लिखित "सवळा" कांदबरी व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थित स्थानिक ज्येष्ठ समाज बंधू - भगिनींचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ पाटसकर यांनी कै. विष्णुपंत रामचंद्र दादरे साहेबांचे जीवनचरित्र कथन केले. याचबरोबर रामभाऊ खांडेकर, संजयजी बाड सर, सुखदेव नरळे, सौ. सुरेखाताई आवटे यांनी उपस्थित समाज बांधवांना संबोधित केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रीमती वनाबाई माणकोजी ढोणे ट्रस्ट आळंदी व पुणेचे अध्यक्ष रामभाऊ खांडेकर पुणे होते. प्रमुख पाहुणे लोणारी समाजाचे सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ खंडेराव पाटसकर पंढरपूर, उद्योजक दत्तात्रय शरदराव लगड ( लोणारी ) पुणे, सामाजिक कार्यकर्ते संजयजी बाड सर पुणे, सुखदेव नरळे चिंचवड, अजित गंगलमाले निगडी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम व आर्थिक मदत करणारे समाज बांधव पुढील प्रमाणे- किसन खिलारे, अमोल जयवंत करांडे, घनश्याम महादेव गवंड, भगवंत आवटे, गुलाब नरळे, नितीन शेळके , संतोष गळवे, मुकेश हिप्परकर, संदीप करचे, दिपक खोत, नवनाथ काळेल, सचिन काळेल, बापूराव राणे,बाळासाहेब करांडे ,राजू काळेल. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भगवंत आवटे यांनी केले. संघाचा वर्षभराचा आढावा संघाचे संस्थापक अध्यक्ष अमोल जयवंत करांडे यांनी मांडला. आभार प्रदर्शन संदीप करचे यांनी मानले.

## नामांतर सोहळा...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**मंगळवेढा :** मंगळवेढा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा संत दामाजी पंत औद्योगिक प्रशिक्षण संस्था असा नामांतरण सोहळा आ. समाधानदादा आवताडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी मान्यवर उपस्थित होते.

## संभाजी ब्रिगेडने दिली मायेची ऊब



**सोलापूर :** संभाजी ब्रिगेड सोलापूरच्या वतीने शहरातील विविध भागातील उपेक्षित, बेघर, भिक्षेकरी, दिव्यांग व्यक्तींना थंडीपासून संरक्षण व्हावे म्हणून रात्रीच्यावेळी ब्लँकेटचे वितरण करण्यात आले. संभाजी ब्रिगेडचे राहुल चव्हाण, तृप्ती चव्हाण यांच्या मातोश्री स्वर्गीय मंगल चव्हाण यांच्या स्मृतिप्रित्यर्थ हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, कार्याध्यक्ष अरविंद शेळके, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, महिला शहराध्यक्षा मोनाली धुमाळ आदी उपस्थित होते.

## पोलिसांचे शेतकरी प्रेरणा अभियान कागदावरच



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** पोलिसांत दाखल गुन्ह्यांमध्ये बहुतेक गुन्ह्यांची कारणे चारित्र्यावर संशय, पैसा व प्रॉपर्टी हीच आहेत. सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीणमध्ये शेतीच्या वादातून एका वर्षात आठ खून झाल्याची नोंद ग्रामीण पोलिसांत आहे. याशिवाय २०२४ मध्ये शेती, जागा या कारणातून सुमारे ४००हून अधिक मारहाण, हाणामारी असे विविध प्रकारचे गुन्हे दाखल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण पोलिस आता शेतकरी प्रेरणा अभियान राबविणार आहेत, पण अजूनपर्यंत तरी हे अभियान कागदावरच असल्याचे चित्र आहे.

## दुचाकीवरून आलेल्या चोरट्याने मंगळसूत्र लांबविले





■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** लग्नकार्य उरकून घरी येत असताना शंकर नगर मधील हार्डवेअर दुकानाजवळ समोरून आलेल्या अज्ञात दुचाकी वाहनावरील पाठीमागे बसलेल्या इसमाने शरीफा मौला शेख (वय 58 राहणार होटगी रोड) यांच्या गळ्यातील 60 हजारांचे मंगळसूत्र हिसकावून नेले आहे. हा प्रकार 16 जानेवारी रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडला. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान सोलापूर शहरात मंगळसूत्र चोरीच्या घटना पुन्हा घडू लागल्याने महिला वर्गामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

### चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्यांना अटक

# तालुका पोलिसांनी विशेष कामगिरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपूर तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर 45 /2025 बी एन एस कलम 309(6) या रॉबरीच्या गुन्ह्यात तीन आरोपींनी मध्य प्रदेश पासिंगची पिकअप गाडी क्रमांक एमपी 09S3010 या गाडीच्या चालकाला चाकूचा धाक दाखवून चालकाला लाथा बुक्क्यांनी मारहाण करून पिकअप गाडी जबरदस्तीने चोरून पिकअप गाडी घेऊन पळून गेले होते.सदर गुन्ह्यामध्ये आरोपीच्या वर्णनावरून एकूण ३ आरोपी ताब्यात घेण्यात आलेले असून त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिलेली आहे.

आरोपींची नावे 1. गोविंद लिंबा पवार (वय 23 वर्ष रा. अंकोली तालुका मोहोळ) 2.निबालअहमद शेख (वय 21 वर्ष रा. चिंचोली ता. पंढरपूर) 3 संच्या मिटकरी (वय 32 रा. आंबे चिंचोली ता. पंढरपूर) असे तीन आरोपी ताब्यात घेण्यात आले. असून त्यांच्याकडून फिर्यादीचे 2 मोबाईल फोन एक पिकअप गाडी त्याचा क्रमांक मप09 S3010 असा एकूण किंमत रुपये 11 लाख 25 हजार रुपयांचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून आरोपींना अटक केलेली आहे.

सदर गुन्हा घडले पासून काही तासात आरोपींना अटक करून गुन्हा उघडकीस आणण्याची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी , अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर , उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर, पीएसआय भोसले , पोलीस हेडकॉन्स्टेबल गजानन माळी, पोलीस हेडकॉन्स्टेबल विनायक क्षीरसागर, ए एस आय तोंडले पोलीस हेडकॉन्स्टेबल रोकडे, पोलीस कॉन्स्टेबल सागर गवळी, पोलीस कॉन्स्टेबल आवटी यांच्या पथकाने केली आहे.

## आमदारसाहेब आमच्या समस्या सोडवा; नागरिकांची मागणी



**सोलापूर :** भारतीय जनता पार्टीचे आमदार सुभाष देशमुख हे जनसंवाद दौऱ्यानिमित्त आपल्या दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील आहेरवाडी येथे आल्यानंतर त्यांनी नागरिकांची भेट घेतली आणि त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी नागरिकांच्या मागण्या आणि समस्या सममजून घेतल्या आणि आगामी काळात यावर उपाययोजना करण्याबाबत चर्चा केली. यावेळी नागरिकांनी त्यांना आमदारसाहेब आमच्या समस्या सोडवा असे म्हणत आपल्या विविध मागण्यांचे निवेदन त्यांना दिले. यावेळी पंडित पाटील, पंचप्पा धनशेट्टी, गुरुनाथ बिराजदार, नागनाथ बोरूटे आदी उपस्थित होते.





आयुर्वेद शास्त्राच्या मताप्रमाणे गीर गाईचे दूध हे ह्युमिनिटीप्रधान तसेच लहान बालकांसाठी अत्यंत उपयुक्त असे आहे.

### मधमाशीपालन व्यवसाय

# शाश्वत विकासासाठी आवश्यक – ध्रुवकुमार बनसोडे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** "शाश्वत विकासासाठी मधमाशीपालन व्यवसाय अत्यंत आवश्यक आहे. शेती क्षेत्रातून भरगोस उत्पादन मिळविण्यासाठी परागीभवन गरजेचे असते ते काम मधमाशा सहजपणे करतात. म्हणूनच या व्यवसायासाठीची आवश्यक कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावी", असे मत महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, सोलापूर येथील जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी ध्रुवकुमार बनसोडे यांनी व्यक्त केले. येथील रयत शिक्षण संस्थेच्या, कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) योजनेंतर्गत 'महाविद्यालयीन प्राध्यापकासाठी व विद्यार्थ्यांसाठी' आयोजित 'मधमाशीपालन' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्घाटक म्हणून ध्रुवकुमार बनसोडे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे, रुसा समन्वयक प्रा. योगेश पाठक, डॉ. चंद्रकांत काळे, प्रा. रेशमा माने, डॉ. अमर कांबळे, डॉ. अमोल मामलाय्या, डॉ. शिल्पा पवार आदी मान्यवर उपस्थित होते. ध्रुवकुमार बनसोडे यांनी यावेळी महाबळेश्वर येथे असलेल्या केंद्राविषयी माहिती दिली. तसेच शासनाकडून सुरु असलेल्या विविध योजनाची माहिती दिली. त्यामध्ये मधकेंद्र योजनेवर विस्तृत प्रकाश टाकला. सदर केंद्राकडून मोफत प्रशिक्षण, आवश्यक साहित्य व विद्यावेतन देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले, विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले. प्रथम सत्रामध्ये मधुक्षेत्रिक महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, सोलापूर, प्रभाकर पलवेंचा यांनी मधमाशीच्या जाती, त्यांची पोळ्याची रचना, मध तयार होण्याची प्रक्रिया, परागीभवनाचा कोणत्या पिकांना फायदा होतो यावर मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रामध्ये चाकूर येथील व्यावसायिक दिनकर पाटील यांनी मधमाशीपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणावर कसा करावा व यामध्ये समाविष्ट असलेल्या शास्त्रीय बाबींवर मार्गदर्शन केले. या वेळी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये एपिस मेलीफेरा या माशीची पेटी ठेवण्यात आली. सर्व सहभागी प्राध्यापक व विद्यार्थ्यांना या माशा दाखविण्यात आल्या व त्या माशा हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. दुपारील सत्रात शुद्ध मध ओळखण्याची तंत्रे शिकविण्यात आली. तसेच सामुहिक पद्धतिने मधाची चवही चाखण्यात आली. या कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे होते. त्यांनी महाविद्यालयामध्ये अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अमर कांबळे यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. अमोल मामलाय्या यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एस.एस. काळे व प्रा. कु, एस. आर. वाघमारे यांनी केले तर आभार प्रा. हर्षदा चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासठी केतन अल्लापुरकर, प्रा. दिव्या गायकवाड, प्रा. कविता कुलकर्णी, प्रा. एस.ए. भोसले यांनी परिश्रम घेतले. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंखेने उपस्थित होते.

pandharisanchar.com

LOCAL

सोमवार, २० जानेवारी २०२५

पंढरी संचार ३

**सोलापूर :** पुणे येथे पार पडलेल्या क्विक हिल फाउंडेशनच्यावतीने आयोजित 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' समारंभात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सायबर क्लबला 'बेस्ट क्लब ओव्हरऑल' हा प्रतिष्ठीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच एमसीएची विद्यार्थीनी सुप्रिया शिंदे यांना "बेस्ट मिडिया डायरेक्टर" हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्यास कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर, डॉ. राजीवकुमार मेंते, मालती जाधव उपस्थित होते.

### जिल्ह्यात या योजनेअंतर्गत 5 हजार 811 घरावर सौर पॅनल बसवण्याचे कामे सुरू

# सुर्य घर योजनेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे- जिल्हाधिकारी

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क




**सोलापूर :** प्रधानमंत्री सूर्य घर योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यात आठ हजार 228 अर्ज प्राप्त झालेले असून 8 हजार 179 अर्जांना मंजुरी देण्यात आलेली आहे तर 5 हजार 811 कामे सुरू असून जवळपास अडीच हजार घरावर सौर पॅनल बसवण्यात आलेले आहेत. ही योजना चांगली असून विजेची बचत होऊन नागरिकांचा वीज कनेक्शनचे बिल ही कमी होते व पर्यावरणाचा ऱ्हास ही कमी होतो. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी प्रधान मंत्री सूर्य घर योजनेत सहभाग घेऊन आपल्या घरावर सौर पॅनल बसवावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

सौर ऊर्जा ही एक स्वच्छ, नूतन आणि पर्यावरणास अनुकूल ऊर्जा स्रोत आहे. भारतात सौर ऊर्जा वापरण्याची गरज वाढत आहे, आणि याच पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री सूर्य घर योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश घरगुती वापरासाठी सौर ऊर्जा प्रणालींचा प्रसार करणे आणि नागरिकांना या पर्यावरणीय उपक्रमात सहभागी करणे आहे.

*पात्रता-सूर्य घर योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी काही महत्त्वाच्या पात्रता निकष आहेत.

*सर्वात प्रथम, अर्जदाराकडे स्वतःचे घर असणे आवश्यक आहे. यामुळे ही योजना घरगुती वापरासाठीच आहे, ज्यामुळे नागरिकांना त्यांच्या स्वतःच्या छतावर सौर पॅनेल बसवण्याची सुविधा मिळते.

* घराच्या छतावर सोलर रूफटॉप सिस्टम बसवण्यासाठी पुरेशी जागा असणे आवश्यक आहे. यामुळे सौर पॅनेल प्रभावीपणे कार्य करू शकतात आणि ऊर्जा उत्पादनात वाढ होईल.

* योजनेसाठी अर्ज करणे आणि आवश्यक कागदपत्रे जमा करणे अनिवार्य आहे. अर्जदाराकडे वैध विद्युत कनेक्शन असावे लागेल, कारण योजनेचा फायदा घेण्यासाठी विदयुत कनेक्शनची गरज असते.

*अर्जदाराने यापूर्वी कोणत्याही इतर सोलर पैनल सब्सिडीचा लाभ घेतलेला नसावा. त्यामुळे योजनेचा लाभ मिळवण्यासाठी नवीन अर्जदारांची निवड केली जाते.

सबसिडी/अनुदान-

सूर्य घर योजनेंतर्गत सौर ऊर्जा प्रणालीच्या क्षमतेवर आधारित सबसिडीची मदत दिली जाते. योजनेत तीन प्रमुख श्रेणी आहेत : 1. ० - १५० युनिट: - सौर ऊर्जा प्रणाली क्षमता: १ - २ किलोवॅट - सबसिडी मदत: रु. ३०,००० ते रु. ६०,०००/-

2. १५० - ३०० युनिट: - सौर ऊर्जा प्रणाली क्षमता: २ - ३ किलोवॅट - सबसिडी मदत: रु. ६०,००० ते रु. ७८,०००/-

3. ३०० पेक्षा जास्त युनिट: - सौर ऊर्जा प्रणाली क्षमता: ३ किलोवॅट पेक्षा जास्त - सबसिडी मदत: रु. ७८,०००/-

या सबसिडीमुळे नागरिकांना सौर ऊर्जा प्रणालीची बसवण्यास प्रोत्साहन मिळते. यामुळे दीर्घकालीन ऊर्जा खर्चात कमी होऊन पर्यावरणीय फायदा मिळतो.

सूर्य घर योजनेचा लाभ जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा यासाठी जिल्हा प्रशासन व वीज वितरण कंपनी मार्फत नागरिकांना प्रोत्साहित केले जात आहे. सौर ऊर्जा प्रणालींचा वापर केल्याने फक्त आर्थिक फायदे होतात असे नाही, तर हे पर्यावरणासाठीसुद्धा उपयुक्त आहे. सौर ऊर्जेचा वापर केल्याने पारंपरिक ऊर्जा स्रोतांवर अवलंबित्व कमी होते आणि कार्बन उत्सर्जनातही घट होते. संपूर्ण समुदायाच्या विकासासाठी आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी नागरिकांनी या योजनेंतर्गत सहभाग घेणे आवश्यक आहे. यामुळे सौर ऊर्जा आणखी प्रभावीपणे वापरली जाईल आणि भविष्याच्या पिढ्यांसाठी एक स्वच्छ आणि हरित वातावरण निर्माण होईल.

## जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्नशील



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मिळाल्यानंतर जयकुमार गोरे यांनी सोशल मीडियाद्वारे आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. गोरे यांनी म्हंटले की आमचे नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी मला दिली आहे. सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी व जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव प्रयत्नशील असेन. पश्चिम महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या सोलापूर या जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी दिल्याबद्दल मी फडणवीस यांचे आभार मानतो.

» पान १ वरुन

## माजी आमदारासह २३ जणांवर...

हे शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून निवडणूक लढवीत होते. त्यांच्या विरुद्ध शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार शहाजी बापू पाटील निवडणूक रिंगणात होते. तर शेकापच्यावतीने डॉ. बाबासाहेब देशमुख निवडणूक लढवीत होते. ही निवडणूक अटीतटीची होऊन यात शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख विजयी झाले आहेत. मात्र या निवडणुकीत दीपकआबा साळुंखे यांच्याकडे जिल्हा बँकेची कोट्यावधी रुपयाचे कर्ज असल्याचे उघड होताच खळबळ उडाली होती.

## अवैध वाळू वाहतूकीवर महसूल प्रशासनाची...

तसेच पंढरपूर शहरातील जुना दगडी पुल या ठिकाणी अवैध वाळू उत्खनन व वाहतुक करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या दोन जेसेबी, चार वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच मौजे ओझेवाडी येथील 2.50 ब्रास वाळूसाठा नष्ट करण्यात आला आहे.

मौजे.चिंचोली भोसे ता.पंढरपूर या कारवाईमध्ये पथक प्रमुख मंडळाधिकारी रवींद्र शिंदे, विजय शिवशरण, ग्राम महसूल अधिकारी संजय खंडागळे, सुमित जाधव, संदीप शिंगारे, महेशकुमार सावंत, गणेश पिसे, महसूल सेवक कुंडलिक शिंदे सहभागी होते.

» Selected

## जिल्हा सरकारी वकिलांचे होत आहे कौतुक



**सोलापूर :** सोलापूरचे जिल्हा सरकारी वकील प्रदिपसिंग राजपूत यांनी आपल्या निजी कक्षाचे उद्घाटन आपल्या कार्यालयाचे सेवक जितेंद्र चंदेले यांचे हस्ते करून समाजासमोर एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. ऍड. राजपूत यांनी यापूर्वीदेखील कोर्ट आवारात बूट पॉलिश करणाऱ्या मुलाचा वाढदिवस साजरा करून अनोखा वस्तूपाठ निर्माण केला होता. त्यांच्या या कार्याचे सोशल मीडियासह समाजातील सर स्तरातून कौतुक होत आहे.

## पंढरपूर डाक विभाग महापेक्स टीम रायगड एक्सप्रेस यांच्याकडून डॉ.श्रीधर येलमार यांचा सन्मान



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** मुंबई येथे 22 जानेवारी ते २५ जानेवारी २०२५ या कालावधी मध्ये वर्ल्ड ट्रेड सेंटर ,मुंबई येथे होणाऱ्या महापेक्स डाक तिकिटांचे प्रदर्शन अंतर्गत जनजागृती साठी छत्रपती संभाजीनगर येथून दिनांक दोन जानेवारी रोजी निघालेली ई-सायकल रॅली पंढरपूर मध्ये दाखल झाली होती. यावेळी पोस्ट तिकीट संग्रहक डॉ.श्रीधर येलमार यांचा डाक विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला. टीम रायगड एक्सप्रेसच्या ई सायकल रॅली चे पंढरपूर डाक विभागाचे डाक अधीक्षक चंद्रकांत भोर साहेब, सहा. अधीक्षक एम. एम. पाटील साहेब, पंढरपूर पोस्ट ऑफिस चे पोस्ट मास्तर सोमनाथ गायकवाड,श्रीकांत माने सहा. अधीक्षक यांनी स्वागत केले.

## सन्मान...

पंढरी संचार छायाचित्र सेवा




**माळशिरस :** कृष्णानंद विद्यालय पाटीलवस्ती येथे, कृष्णानंद सोशल फाऊंडेशनच्या वतीने कृष्णानंद यशोदीप पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास आ. विजयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीतविवीध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रशालेचे माजी विद्यार्थी मान्यवर व अधिकारी यांचा सन्मान केला.

## सैनिक स्कूल ॲडमिशन अर्जासाठी 23 जानेवारीपर्यंत संधी



**सोलापूर :** ऑल इंडिया सैनिक स्कूल ॲडमिशन 2025 प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली आहे. 23 जानेवारी 2025 पर्यंत ही मुदतवाढ देण्यात आली असून, नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) च्या अधिकृत वेबसाईटवर जाऊन विद्यार्थ्यांना नोंदणी करावयाची आहे. पूर्वी 13 जानेवारीपर्यंत अर्ज करण्याची मुदत होती. ती वाढवून आता 23 जानेवारीपर्यंत केली आहे. तर परीक्षा फी भरण्याची अंतिम तारीख 24 जानेवारी आहे.




## जिल्हा बँकेकडून सांगोला कारखान्यावर कारवाई



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने तारण कर्ज घेऊन नंतर तारण मालाची बँकेच्या परस्पर स्वतःच्या फायद्यासाठी विक्री करून बँकेची फसवणूक केल्याप्रकरणी बँकेच्या तत्कालीन संचालकांशी संबंधित साखर कारखान्यांविरुद्ध फौजदारी कारवाईचा बडगा उगारला आहे. पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे व सध्या शिवसेना ठाकरे गटाचे असलेले माजी आमदार दीपक साळुंखे यांच्याशी संबंधित सांगोला तालुका साखर कारखान्यावरही फौजदारी कारवाईचा आसूड उगारण्यात आला आहे.

## भाजपा सदस्य नोंदणी अभियान सुरू

**पंढरपूर :** संपूर्ण देशात भारतीय जनता पक्ष सदस्यता नोंदणी अभियान राबवण्यात येत आहे. सदर अभियानाच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील कार्यकर्त्यांची बैठक घेऊन या अभियानाबद्दल जास्तीत-जास्त नागरिकांना माहिती देत सहभागी करून सदस्यता घेण्यासंदर्भात आमदार समाधान आवताडे यांनी आवाहन केले. पक्षाच्या संघटनात्मक व्याप्तीसाठी सदर अभियानामध्ये सर्वांनी प्रयत्न करून मोठ्या संख्येने सभासद नोंदणी करण्याचे ही यावेळी आवाहन केले.

जलसंपदा विभाग शासन निर्णय, क्रमांक निविदा 0417/प्र.क्र.247/मोप्र-१ दि. 18/10/2023

**परिशिष्ट-3**
**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**पत्ता :- पाटबंधारे संशोधन विभाग, 8 मोलेदीना रोड, कॅम्प, पुणे- 411001**
**ई-मेल पत्ता :- irdpune@gmail.com दूरध्वनी क्र. 020-26361138**

**निविदा सुचना क्र. 13 सन 2024-25**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे संशोधन विभाग, पुणे- 411001 जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील उचित वर्गात नोंदणीकृत असलेल्या **वर्ग-7 व त्यावरील नोंदणीकृत कंत्राटदार** यांचेकडून खालील कामाकरीता ब-1 नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाचे संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, पाटबंधारे संशोधन विभाग, पुणे- 411001 यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | |
|---|---|
| **कामांची नांवे** | : 1 ) Maintenance & Repairs to Bhamburdi No. 1, Bhamburdi No.3. Gursale No. 1, Gursale No. 2 and Kurbavi No. 3. Drainage Schemes in the command area of Nira Right Bank Canal Tal. Malshiras, Dist. Solapur for the year 2024-25. |
| **जिल्हा** | : वरील काम हे **सोलापूर** जिल्ह्यातील आहे. |
| **निविदेची किंमत रुपये** | : 1 ) रु. 20,63,020/- |
| **निविदा उपलब्ध कालावधी** | : दिनांक-20/01/2025 ते दिनांक 27/01/2025 सायं. 18.00 वाजेपर्यंत. |
| **निविदा उघडण्याचा दिनांक** | : दिनांक 29/01/2025 रोजी दुपारी 12.30 वा. (शक्य झाल्यास) |

जा.क्र.पासविं/लेखा/-२/निविदा/69/2025
पाटबंधारे संशोधन विभाग,पुणे -01
दिनांक - 10/01/2025

सही/-
(प्रि.सु.लांजेकर)
कार्यकारी अभियंता
पाटबंधारे संशोधन विभाग,पुणे-411001.

प्रत- नोटीस बोर्ड (विभागीय कार्यालय)

**जिमाका/सो/जाहि/२६७/२०२४-२५**

### कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने ऊस तोडणीचे यंत्र उपलब्ध

# त. शेटफळ परिसरात यंत्रामुळे ऊसतोड गाळपाला गती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** तपकिरी शेटफळ परिसरात मोठ्या प्रमाणात ऊस लागवड केली जाते. मात्र, मजुरांचा अभाव व ऊस क्षेत्र अधिक आहे. त्यामुळे ऊस गाळपाला उशीर होत असल्याने कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने ऊस तोडणीचे यंत्र उपलब्ध करून दिल्याने ऊस गाळपाला गती मिळाली आहे.

यंदा गरजेप्रमाणे ऊसतोड मजुरांच्या टोळ्या उपलब्ध झाल्या; परंतु यावर्षी शेतकऱ्यांचा यंत्राच्या माध्यमातून ऊस तोडणीकडे कल असल्याचे दिसत आहे. विधानसभा निवडणुकीमुळे हा हंगाम जवळपास महिनाभर लांबल्यामुळे ऊस गाळपास उशीर होत असल्याने यंत्राच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर ऊसतोड तालुक्यात होत आहे. ऊस वेळेवर जात असल्याने उसाचे उत्पादन वाढल्याने शेतकरी समाधान व्यक्त करत आहेत.

ऊस काढणी यंत्राच्या साह्याने ऊस काढणे लवकर होते.

दररोज एक मशीन सरासरी १३५ ते १५० टन ऊस तोडणी करते. यात शेतकऱ्यांच्या उसाचे कोणतेही नुकसान होत नाही. यामुळे वेळेवर शेतकऱ्यांना ऊस गाळपाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे.

हार्वेस्टरद्वारे जलद छाटणी होत असल्याने मोठे क्षेत्र कव्हर केले जाते. ऊस छाटणी करणे, पाचट तासणे,वाढे छाटणे आणि उसाचे लहान तुकडे म्हणजे बिलेट करून ते ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरणे ही कामे मशीन लगोलग करीत असल्यामुळे मजुरांची गरज भासत नाही.

जमिनीलगत ऊस छाटला जात असल्यामुळे ऊसाची बुडाजवळची जास्त शर्करा असलेली सर्व पेरी गाळपासाठी जातात.

संपादकीय विशेष

# अर्थविश्व घुसळून निघतेय...

गेल्या महिन्यामध्ये रुपया प्रति डॉलर 85.80 च्या घरात होता. मात्र तोच आता 87 रुपयांच्या दिशेने घसरताना दिसत आहे. ही घसरण मुख्यत्वे अमेरिकेतील घडामोडींच्या परिणामस्वरुप बघायला मिळत आहे. एक म्हणजे अमेरिकेतील रोजगारनिर्मिती वाढली असल्यामुळे स्वाभाविकच त्यांच्याकडील बेरोजगारीचा दर कधी नव्हे इतका म्हणजेच साडेचार टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. त्यांच्याकडील चलनवाढ बऱ्यापैकी नियंत्रित राहिल्यामुळे लोकांची क्रयशक्तीही वाढली आहे. परिणामस्वरुप गेल्या काही महिन्यांपासून अमेरिकन अर्थव्यवस्था वाढ दाखवत आहे. रुपयाचे मोठ्या प्रमाणात अवमूल्यन होण्यामागे अमेरिकेतील व्याजाचे दर वाढणे हे एक कारण आहे. चलनवाढ नियंत्रित ठेवण्यासाठी अमेरिकेने व्याजदर वाढवला. परिणामी तेथील रोखे वा गुंतवणुकीचे अन्य पर्याय अधिक आकर्षक झाले. अमेरिकेतील गुंतवणुकीचा दर्जा नेहमीच वरचा असल्यामुळे भारतीय शेअर बाजारावर प्रतिकूल परिणाम बघायला मिळत आहे. चालू महिन्याचा विचार करता दोन-अडीच लाख कोटी रुपयांची गुंतवणूक देशाबाहेर गेली आहे. एकंदरच, अमेरिकन अर्थव्यवस्थेला नवी बळकटी वा नवा जोम प्राप्त झाल्यामुळे भारताला फटका बसल्याचे चित्र समोर येत आहे.

अमेरिकेतील गुंतवणूक आणि उत्पादन वाढत असल्यामुळे तेथील इतर गुंतवणुकीनाही बऱ्यापैकी प्रोत्साहन मिळत आहे. त्यामुळेच आधी उल्लेख केल्यामुळे भारतातील गुंतवणूकदार त्याकडे आकर्षित होत आहेत. शेअर मार्केटचा विचार केला तर पाच लाख कोटींची रक्कम बाहेर गेली आहे. त्याचा फटका बराच मोठा म्हणता येईल. दुसरीकडे, क्रूड ऑईल अर्थात खनिज तेलाच्या किमतीही वाढल्या आहेत. आपण जाणतो की भारताची सर्वाधिक खरेदी खनिज तेलांची असते आणि त्यासाठी मोठ्या प्रमाणात डॉलर खर्च होतात. या खरेदीसंदर्भात रशिया वा इराकसारख्या देशांबरोबर करार असले तरी मोठ्या प्रमाणातील खरेदी डॉलरमधून करावी लागते. स्वाभाविकच रुपयाच्या अवमूल्यनाला ही बाबही कारणीभूत आहे. डॉलरची मागणी वाढल्यामुळे, त्याचा भाव वर जात असल्यामुळे रुपया खाली येतो आहे. इथे ही बाबदेखील लक्षात घ्यायला हवी की, रुपयाला स्थिरता देण्यासाठी रिझर्व्ह बँकदेखील मोठ्या प्रमाणात डॉलर विकत आहे. आपल्या एकंदर अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणामही बघायला मिळतो आहे.

अर्थव्यवस्थेवर एक ना अनेक बाबींचा परिणाम होत असतो. देशाचे आयात-निर्यात धोरण हा त्यातील एक महत्त्वाचा भाग आहे. या अनुषंगाने बघता सध्या भारताची निर्यातही मंदावली आहे. रुपयाची कमत खाली गेल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपल्या उत्पादनांची कमत तितकी स्पर्धात्मक राहिलेली नाही. परिणामस्वरुप एकीकडे आयात वाढती राहिली असली तरी निर्यात मात्र कमी झाली आहे. हा आयात-निर्यातीतला फरकही अर्थव्यवस्था अस्थिर करण्यास कारक ठरत आहे. अशा प्रकारे कोणत्याही कारणास्तव परकीय चलन बऱ्याच प्रमाणात कमी होणे निश्चितच चांगली बाब म्हणता येणार नाही. आयात उत्पादनाच्या किमती वाढत असताना चलनवाढीवर परिणाम होणे स्वाभाविक आहे. अर्थातच हा परिणामही भारतीय अर्थव्यवस्थेसाठी चांगला नाही.

अलिकडे समोर आलेल्या माहितीनुसार देशातील उत्पादनही कमी होताना दिसत आहे. याचे कारणही वाढती आणि महागडी आयात हेच आहे. मागील महिन्यामध्ये गाड्यांच्या किमती मोठ्या प्रमाणावर वाढल्या. कच्च्या मालाच्या किमतीमध्येही मोठी वाढ पहायला मिळाली. स्वाभाविकच याचा परिणाम अन्य उत्पादनांच्या कमतवाढीच्या रुपात दिसून येतो. यंदा पाऊस चांगला झाला, पिके चांगली आली आणि त्यामुळे ग्रामीण भागातील मागणी वाढती असली तरी शहरी भागातील मागणी अद्याप वाढलेली नाही. लोक अजूनही सढळ हाताने खरेदी करताना दिसत नाहीत. भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणामही जाणवत आहे. या सगळ्याबरोबरच अमेरिकेतील राजकीय बदल, डोनाल्ड ट्रम्प यांचे अध्यक्षपदी येणे हेदेखील या सगळ्या अस्थिरतेमागील एक महत्त्वाचे कारण आहे. डोनाल्ड ट्रम्प यांचे जागतिक महासत्ता असणाऱ्या अमेरिकेसारख्या देशाच्या अध्यक्षपदी येणे ही भारताच्याच नव्हे तर, अनेक देशांच्या दृष्टीने चतेची बाब आहे. याचे कारण ट्रम्प यांनी जाहीर केलेली धोरणे. आपण अमेरिकेच्या उत्पादनांना प्रोत्साहन देणार असल्याचे आधीच त्यांनी सांगितले आहे. अर्थातच यासाठी ते बाहेरुन येणाऱ्या उत्पादनांवरील कर वाढवतील. त्याचाही परिणाम एव्हाना जाणवू लागला आहे.

त्यांनी सांगितल्यानुसार चीनमधून येणाऱ्या उत्पादनांवर सर्वाधिक कर लावण्यात येणार आहे. भारतीय उत्पादनेही यातून सुटणार नाहीत. स्वाभाविकच याचा परिणाम अनिश्चिततेच्या रुपाने समोर येत आहे. दुसरे म्हणजे तेथील नोकरशाही बळकट करण्यासाठी त्यांनी एक समिती स्थापन केली असून त्यायोगे या क्षेत्रामध्ये होणारा खर्च कमी करण्याचे संकेतही दिले आहेत. त्यामुळेच त्या त्या क्षेत्रातील सरकारी खर्च कमी होण्याचा धोकाही अनेकांनी व्यक्त केला आहे. त्याचबरोबर घुसखोरांबाबतचे त्यांचे धोरणही स्पष्ट आहे. आधीच जाहीर केल्याप्रमाणे निर्वासित आणि अवैधरित्या अमेरिकेत आश्रय घेणाऱ्या लोकांना आम्ही हुसकावून लावू, असे त्यांचे म्हणणे आहे. ट्रंप यांच्या कार्यकाळात व्हिसापद्धतीत महत्त्वपूर्ण बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळेच बी-1 व्हिसाबद्दल साशंकता होती. मात्र याबाबत थोडी नरमाईची भूमिका घेतल्यामुळे ताण कमी झालेला दिसतो. अर्थात असे असले तरी कधीही धोरणात बदल होण्याच्या शंकेने भारतातील आयटी क्षेत्र धास्तावले आहे. एकंदरच ही सर्व परिस्थिती जागतिक आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम दाखवत आहे. प्रत्यक्षात ट्रम्प यांनी कारभार हातात घेतल्यानंतर अनुसरलेली धोरणे आणि त्यांचे परिणाम समोर आल्यानंतर पुढील आर्थिक चित्र स्पष्ट होऊ शकेल. ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या धोरणांनुसार अमेरिकेतील लोकांवरील कराचा बोजा कमी केला तर लोकांची क्रयशक्ती वाढून तेथील उत्पादनांना चालना मिळेल आणि बाहेरच्या उत्पादनांना चांगली मागणी निर्माण झाली तरी वाढीव कर आकारुन त्यांना स्पर्धेबाहेर ठेवण्याचे प्रयत्न होतील, अशी शक्यता जास्त आहे. अशा प्रकारे प्रामुख्याने चीन आणि अमेरिकेमधील व्यापारी संबंध ताणले गेल्यास संपूर्ण जगावर परिणाम होताना दिसेल.

# 'रिअल' वाढ, कृषी क्षेत्राचा आधार

**सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीमध्ये काही निष्कर्ष समोर आले. पहिले म्हणजे भारतीय रिअल इस्टेट क्षेत्रामध्ये परदेशी गुंतवणुकदारांतर्फे होणाऱ्या गुंतवणुकीमध्ये मोठी वाढ अनुभवायला मिळाली. दुसरी लक्षवेधी बाब म्हणजे नजिकच्या भविष्यात कृषी क्षेत्र अर्थव्यवस्थेला तारणार, असे निरिक्षण नोंदवण्यात आले. दरम्यान, शेअर बाजारात अस्थिरता वाढत असताना एसआयपीमध्ये जादा गुंतवणूक होत असल्याचे दिसून आले.**

महेश देशपांडे
ARTH

सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीमध्ये उलाढालीच्या पातळीवर काही महत्वपूर्ण घडामोडी बघायला मिळाल्या. त्यातून काही निष्कर्षही समोर आले. पहिले महत्वाचे अर्थवृत्त म्हणजे भारतीय रिअल इस्टेट क्षेत्रामध्ये परदेशी गुंतवणुकदारांतर्फे होणाऱ्या गुंतवणुकीमध्ये मोठी वाढ अनुभवायला मिळाली. दुसरी लक्षवेधी बाब म्हणजे नजिकच्या भविष्यात कृषी क्षेत्र अर्थव्यवस्थेला तारणार, असे निरिक्षण नोंदवण्यात आले. दरम्यान, शेअर बाजारात अस्थिरता वाढत असताना एसआयपीमध्ये जादा गुंतवणूक होत असल्याचे दिसून आले.

देशाची अर्थव्यवस्था बळकट होत चालल्याचे चित्र सध्या दिसत आहे. भारत परदेशी गुंतवणूकदारांसाठी मोठी बाजारपेठ बनत चालला आहे. २०२४ मध्ये रिअल इस्टेट क्षेत्रातील खासगी इक्विटी गुंतवणूक ४.१५ अब्ज डॉलर होती. वार्षिक आधारावर ती ३२ टक्क्यांनी वाढली आहे. या क्षेत्रातील एकूण संस्थात्मक गुंतवणूक ८.९ अब्ज डॉलर्स होती. ही २००७ च्या ८.४ अब्ज डॉलर्सच्या विक्रमाला मागे टाकणारी आहे. गेल्या वर्षी निवासी क्षेत्रात सर्वाधिक गुंतवणूक झाली होती. ४५ टक्के गुंतवणूक या क्षेत्रात झाली. २०२४ हे वर्ष भारतीय रिअल इस्टेट क्षेत्रासाठी खास ठरले. विशेषतः निवासी बाजारात गुंतवणूकदारांनी भरपूर पैसे गुंतवले. 'कोलिअर्स इंडिया'च्या अहवालानुसार, निवासी मालमत्तांची वाढती मागणी आणि सरकारच्या सहाय्यक धोरणांमुळे गुंतवणूकदारांचा विश्वास आणखी वाढला. देशांतर्गत गुंतवणूकदारांनी एकूण गुंतवणुकीत ३७ टक्के योगदान दिले. त्यामुळे या वर्षी म्हणजेच २०२५ मध्ये रिअल इस्टेट क्षेत्रातील गुंतवणुकीचे सर्व विक्रम मोडीत निघतील आणि हे क्षेत्र नवा विक्रम करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

२०२४ मध्ये भारतीय निवासी बाजारपेठेतील संस्थात्मक गुंतवणूक ४६ टक्क्यांनी वाढून १.१५ अब्ज डॉलरवर पोहोचली. हा आकडा २०२३ मधील ७८.८९ दशलक्ष डॉलरपेक्षा जास्त आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, गुंतवणूकदार आता भारतीय रिअल इस्टेटकडे एक मजबूत आणि सुरक्षित बाजारपेठ म्हणून पाहत आहेत. गुंतवणूकदार या क्षेत्रात गुंतवणुकीत प्रचंड रस दाखवत आहेत. घरांमध्येच नव्हे, तर औद्योगिक आणि ऑफिससारख्या क्षेत्रातही गुंतवणूक वाढली आहे. २०२४ मध्ये २.५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्यात आली. ती २०२३ मधील ८७.७६ दशलक्ष डॉलर्सपेक्षा किती तरी पटीने जास्त आहे. यावरून कंपन्या भारतात आपला व्यवसाय झपाट्याने वाढवण्यास तयार असल्याचे दिसून येते.भारतीय रिअल इस्टेटमधील एकूण संस्थात्मक गुंतवणूक २०२४ मध्ये ६.५ अब्ज डॉलरवर पोहोचली. ती २०२३ मधील ५.४ अब्ज डॉलरच्या तुलनेत २२ टक्क्यांनी अधिक आहे. २०२० नंतरचा हा उच्चांकी आकडा आहे. 'गोल्डन ग्रोथ फंड'चे सीईओ अंकुर जालान यांच्या मते या यशात सरकारच्या धोरणांचा मोलाचा वाटा आहे. गेल्या काही वर्षांमध्ये रिअल इस्टेट क्षेत्राची मागणी प्रत्येक स्तरावर वाढली असून, देशी-विदेशी गुंतवणूकदार आकर्षित झाले आहेत.

आता एक वेगळी बातमी. देशाच्या आर्थिक विकास दराबाबत (जीडीपी) अनेक अहवाल येत आहेत. त्यात सकल देशांतर्गत उत्पादनासाठी वेगवेगळे अंदाज दिले जात आहेत. बँक ऑफ बडोदाच्या अलीकडील अहवालानुसार, कृषी क्षेत्र २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये ३.८ टक्के इतकी मजबूत वाढ नोंदवण्याची अपेक्षा आहे. २०२३-२४ मध्ये ही वाढ ३.४ टक्के होती. गेल्या वर्षीपेक्षा आतापर्यंत रब्बीच्या पेरण्या जास्त झाल्या असून कृषी विकासासाठी हे चांगले लक्षण आहे. डिजिटल पेमेंट, वीज मागणी, सेवा क्षेत्रातील उपक्रम, हवाई प्रवाशांची संख्या, टोलद्वारे होणारी वाढती कमाई आणि जीएसटी संकलन यासारख्या सकारात्मक निर्देशांकांसह चालू आर्थिक वर्षाच्या उत्तरार्धात देशाचा विकास दर वाढण्याची अपेक्षा आहे. जीएसटी संकलनात झालेली वाढ ही उपभोगाच्या मागणीत वाढ दर्शवते. २०२४-२५ च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये जीएसटी संकलनात ८.३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. हे उपभोगाच्या मागणीत वाढ झाल्याचे लक्षण आहे. या अहवालानुसार, चांगल्या कृषी उत्पादनांमुळे आणि उत्तम विक्रीच्या अंदाजामुळे ग्रामीण मागणीला चालना मिळेल तर शहरी मागणीतही सुधारणा होण्याची चिन्हे आहेत. डिसेंबर २०२४ मध्ये महागाई कमी झाली आणि येत्या काही महिन्यांमध्ये आणखी घसरण अपेक्षित आहे; मात्र रुपयाचे सतत होणारे अवमूल्यन हा एक मोठा धोका आहे. काही उच्च वारंवारता निर्देशांकांनी डिजीटल पेमेंट, विजेची मागणी, इलेक्ट्रॉनिक आयात आणि खतांच्या विक्रीत वाढ झाल्यामुळे कृषि उत्पादनांची मागणी वाढण्याचे संकेत दिले आहेत.



अहवालात असेही म्हटले आहे की अलिकडच्या काळात प्रवासी वाहनांची एकूण विक्री कमी राहणेही एक द्योतक मानता येते. कारण ग्रामीण आघाडीवर रोख प्रवाहाच्या समस्या आणि ग्राहक ईव्ही मार्केटकडे वळल्यामुळे दुचाकींच्या विक्रीत मोठी घट झाली. विशेष म्हणजे, पहिल्या आगाऊ अंदाजानुसार, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ७.३ टक्के वाढ होईल. आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील वाढीपेक्षा ती चार टक्के असेल. त्यामुळे येत्या काही महिन्यांमध्ये आर्थिक व्यवहारांमध्ये स्थिर वाढ होण्याची शक्यता वाढेल. त्याचाही परिणाम अनुभवायला मिळेल.

दरम्यान, एक लक्षवेधी अर्थनिरिक्षण समोर आले आहे. विदेशी गुंतवणूकदारांकडून भारतीय शेअर बाजारातील समभागांची विक्री करून पैसे काढून घेण्याचे सत्र एकीकडे सुरू असताना डिसेंबर महिन्यात इक्विटी म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक वाढली आहे. रिटेल गुंतवणूकदारांच्या भक्कम पाठिंब्यामुळे एसआयपीद्वारे पहिल्यांदा करण्यात येणाऱ्या गुंतवणुकीची रक्कम २६ हजार कोटींहून अधिक झाली आहे. 'असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया'ने यासंदर्भातील आकडेवारी जाहीर केली आहे. डिसेंबर महिन्यात म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक १४.५ टक्क्यांनी वाढून ४१ हजार १५६ कोटी रुपयांवर गेली आहे. त्यामध्ये इक्विटी म्युच्युअल फंडमध्ये सर्वाधिक गुंतवणूक स्मॉल कॅपमध्ये आली आहे. स्मॉल कॅप आणि मिड कॅप फंडमध्ये जोखीम अधिक असूनदेखील म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूकदारांनी आर्थिक गुंतवणूक कायम ठेवली आहे. डिसेंबर महिन्यात म्युच्युअल फंडमध्ये 'एसआयपी'द्वारे २६ हजार ४५९.४९ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. नोव्हेंबर २०२४ मध्ये ही रक्कम २५ हजार ३१९.६६ कोटी रुपये होती. डिसेंबरमध्ये एसआयपी खात्यांची संख्या सर्वोच्च होती. ती दहा कोटी ३२ लाख दोन हजार ७९६ पर्यंत पोहोचली आहे. नोव्हेंबर महिन्यात ही संख्या दहा कोटी २२ लाख ६६ हजार ५९० इतकी होती. डिसेंबर महिन्यात म्युच्युअल फंड फोलिओची संख्या २२.५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

म्युच्युअल फंडमधील 'असेट अंडर मॅनेजमेंट'ची रक्कम मात्र कमी झाली आहे. ६८ लाख आठ हजार कोटींवरुन ती ६६ लाख ९३ हजार कोटी रुपयांवर आली आहे. 'असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया'चे 'सीईओ' वेंकट चालसानी यांच्या मतानुसार शेअर बाजारात होत असलेल्या घडामोडी आणि 'बाँड स्कीम्स'मधून काढण्यात आलेल्या एक लाख २७ हजार कोटी रुपयांमुळे हा परिणाम दिसत आहे; मात्र महत्त्वाचा मुद्दा शेअर बाजारात अस्थिर बाजार स्थिती असूनदेखील इक्विटीशी निगडित योजनांमध्ये गुंतवणूक वाढली आहे, हा आहे. 'मोतिलाल ओसवाल एमसी'चे मुख्य सीबीओ अखिल चतुर्वेदी यांच्या मतानुसार इक्विटी फंड, विशेषत: स्मॉल कॅप आणि 'सेक्टोरेल थीमॅटिक फंड'ला मोठी मागणी होती; तर 'कोटक महिंद्र एएमसी'चे नॅशनल हेड मनीष महेता यांनी गुंतवणूकदार आपल्या जोखमीच्या क्षमतेनुसार गुंतवणूक करत असून त्यांच्यामधील परिपक्वता दिसून येत असल्यामुळे 'सेक्टोरल' आणि 'थीमॅटिक फंड्स कॅटेगरी'मध्ये गुंतवणूक दुप्पट झाल्याचे सांगितले.




## राशीभविष्य

- **मेष** : दिवसाची सुरूवात उत्तम होईल. नव्या आकांक्षेने कार्यरत रहाल. नव्या संधींचा लाभ घ्या.
- **वृषभ** : घडलेल्या घटनांवर अधिक विचार करू नका. वर्तमानातील स्थितीकडे लक्ष द्या. प्रगती होईल.
- **मिथुन** : अर्धवट ज्ञानातून निष्कर्षाप्रत येऊ नका. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. वैवाहिक सौख्य लाभेल.
- **कर्क** : सहजीवनात जोडीदाराशी मतभेद टाळावे. मुलांच्या संगतीबाबत काळजी घ्या. आर्थिक ताण राहील.
- **सिंह** : संधी प्राप्त होतील. नव्या उत्साहाने कार्यरत रहाल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहणार आहे.
- **कन्या** : आर्थिक समाधान लाभेल. व्यवसायात तुर्तास बदल नको. विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव मिळेल.
- **तूळ** : कामाची योग्य आखणी करा. अनुभवींचा सल्ला महत्त्वाचा ठरेल. नव्या योजनांना गती येणार आहे.
- **वृश्चिक** : मनाप्रमाणे सारं घडत जाईल. उगाच चिंता करू नये. भागीदारी व्यवसायात उत्तम स्थिती राहील.
- **धनु** : कर्ज प्रकरणाबाबत दिलासा मिळेल. परिश्रम आणि सातत्य गरजेचे ठरेल. प्रवासात काळजी घ्यावी.
- **मकर** : आत्मविश्वास कायम ठेवावा. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात प्रगतीच्या संधी लाभेल. विचारानं रहायला हवं.
- **कुंभ** : कौटुंबिक प्रश्नांबाबत दिलासा मिळेल. धनलाभाचे योग आहेत. महत्त्वाच्या गाठीभेटी होतील.
- **मीन** : आर्थिक व्यवहार विचारानं करावेत. उपजत कला–गुणांचा विकास होईल. बाकी चिंता नसावी.

सल्ला मोलाचा

## हरपतोय भावनांचा ओलावा

सध्याच्या कमालीचा स्वार्थ बोकाळलेल्या स्थितीत एकमेकांविषयी जिव्हाळा हरपत चाललाय का, असा प्रश्न सातत्यानं समोर येतो. सध्या आपण यांत्रिक पद्धतीने जगतोय का, असंच कधी कधी वाटायला लागतं. सगळं आपण इतकं गृहीत धरुन चाललोय की नकळत भावनाशून्यतेकडे वाटचाल सुरू आहे की काय, अशीही शंका डोकावून जाते. एखाद्याचा वियोग, एखादं दु:ख अथवा अगदी एखादं सुख या कुठल्याही भावनांचे तरंग अलिकडे फार लवकर विरतात असं वाटतं. अशा घटनांच्या प्रभावातून पटकन बाहेर येण्याचा आपला स्वभाव बनत चाललाय. म्हणून खूप आनंदाची बातमी समजली तरी तिची आंदोलनं आपल्याला खूप आनंद देत नाहीत तर दु:खाचा डोंगर कोसळला तरी व्यवहारी जग आपल्याला ते व्यक्त करण्याची मुभा देत नाही. कारण अशी टोकाची परिस्थिती अनेकदा विविध रुपाने, विविध उदाहरणाने आपल्यासमोर येत असते. ऐकून, पाहून, वाचून, अनुभवून आपण तिचा एक भाग झालेलो असतो. असं का, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

## २० जानेवारी

दिनविशेष

- **१९५७** : पंडित नेहरू यांनी तारापूर अणुशक्ती केंद्राचे उद्‌घाटन केले.
- **१९७२** : अरुणाचल प्रदेश आणि मेघालय यांना घटक राज्याचा दर्जा दिला.
- **१९९३** : अभिनेत्री ऑड्रे हेपबर्न यांचं निधन.
- **१९९९** : गिरीश कर्नाड यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर.
- **२०१४** : आसामी कवी रवींद्र सरकार यांना २०१३ चा 'साहित्य अकादमी' पुरस्कार जाहीर.
- **२०१५** : युरोपीय महासंघाकडून हापूसवरील बंदी उठवण्याचा निर्णये.

महत्त्वपूर्ण काही...

## स्मृतिभ्रंशाचा वाढतोय धोका

भारतात करण्यात आलेल्या एका अभ्यासानुसार सध्या ४९ लाखांहून अधिक ज्येष्ठ नागरिकांना अल्झायमरचा त्रास आहे. ६५ वर्षांच्या पुढच्या १० माणसांमागे एकाला स्मृतिभ्रंशाचा आजार भेडसावत असल्याचं आढळलं आहे. ८५ वर्षांच्या पुढे वय असणाऱ्यांमध्ये हेच प्रमाण दर चार व्यक्तींमध्ये एक असं आहे. जगात एकूण चार कोटी ६८ लाखांहून अधिक लोक या आजाराचे बळी ठरले आहेत. आधुनिक औषधांमुळे वयोमर्यादा वाढली असली तरी या आजारामुळे हे वाढतं आयुष्य शाप बनत चाललं आहे. दरम्यान, २०५० पर्यंत जगभरातील साडेतेरा कोटींहून अधिक लोक स्मृतिभ्रंशाचे बळी असतील असा भयावह अंदाज जागतिक आरोग्य संघटनेनं व्यक्त केला आहे. त्यामुळे मुळातच हा आजार होऊ नये म्हणून तरुणपणापासूनच व्यायाम, त्यातही योग आणि प्राणायामाकडे वळणं आवश्यक आहे. अनेकदा वयाचं कारण देऊन या आजाराकडे दुर्लक्ष केलं जातं. पण या आजाराची सुरुवातीची लक्षणं दिसू लागल्याबरोबर उचित उपचारांकडे वळणं ही महत्त्वाची पायरी असल्याचं जागतिक आरोग्य संघटनेनं स्पष्ट केलं आहे.

पंचांग

**सोमवार, २० जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष कृ. ६, नक्षत्र : हस्त
चंद्रराशी : कन्या, सुकर्मा योग,
सूर्योदय : ७.१४, सूर्यास्त : ६.२४

फॉरवर्डस

आयुष्य म्हणजे ऊन–सावलीचा खेळच जणू...

**गुजर जायेगा ये दौर भी गालिब, जरा इत्मिनान तो रख,**
**जब खुशी ही न ठहरी तो गम की क्या औकात है...**

आरोग्यमंत्र

## कोरड्या खोकल्याचा त्रास?

थंडी हळुहळू कमी होत असली तरी सध्या थंडीचा कडाका वाढत आहे. अशा वाढत्या थंडीमुळे खोकल्याचा त्रास जाणवतो. विशेषत: रात्रीच्या वेळी खोकल्याचं प्रमाण वाढतं. औषधांसोबतच काही घरगुती उपायांनीही लवकर आराम पडू शकतो. त्यामुळे औषधोपचारांसोबत हे उपचार करून बघायला हरकत नाही. अशा उपचारांविषयी...

* मिठाच्या पाण्याच्या गुळण्या हा कोरड्या खोकल्यावरील रामबाण उपाय ठरतो. पेलाभर पाणी गरम करून त्यात चिमूटभर मीठ घालावं आणि या पाण्याने गुळण्या कराव्या. यामुळे लवकर आराम पडेल.
* झोपल्यानंतर सतत खोकला येत असेल तर मध घ्यावा. मधामुळे घशाला ओलावा मिळतो आणि खोकल्याचं प्रमाण कमी होतं. एक छोटा चमचा मध घेतल्याने आराम मिळू शकतो.
* झोपण्याआधी आलं घातलेला चहा प्यावा. ग्रीन–टी किंवा गरम पाणीही चांगले परिणाम दाखवेल. गरम पेयामुळे घशाला शेक मिळतो आणि खोकल्याचं प्रमाण कमी होतं.



* खूप खोकला असेल तर सपाट पृष्ठभागावर झोपू नये. उशी घेत नसाल तर खोकला जाईपर्यंत डोक्याला आधार द्या. यामुळे खोकला कमी होईल.
* नाकाला बाम लावा. सर्दीमुळे नाक चोंदलं असेल तर यामुळे आराम मिळेल आणि खोकला थांबू शकेल.

वाचा तर खरं

मेकअप करणं ही सध्याची गरज आहे. ऑफिसमध्ये जाताना अथवा सणा–समारंभाच्या निमित्ताने मेकअप केला जातो. पण तुमचं वय ४० पेक्षा जास्त असेल तर मेकअप करताना काळजी घ्या. या वयात डार्क मेकअप करु नका. या वयोगटातील महिलांनी फाऊंडेशनचा माफक वापर करावा. फाऊंडेशननं फाईन लाईन्स तयार होतात आणि वय कळतं. त्याऐवजी मॉश्चरायझरचा वापर योग्य ठरतो. लिपस्टिकची योग्य शेड वय कमी भासवण्यास मदत करते. मात्र डार्क मरुन किंवा डार्क ब्राऊन शेड पाच–सहा वर्षानं मोठं दाखवू शकते.

करिअरवाटा

## व्हा ऑप्टोमेट्रिस्ट

दोस्तांनो, आजकाल कारकिर्दीच्या नवनवीन संधी उपलब्ध होत आहेत. त्यांची माहिती असणं गरजेचं ठरत आहे. उदाहरणादाखल ऑप्टोमेट्रिस्टच्या कारकिर्दीचा विचार करू. डोळ्यांची तपासणी करताना वापरल्या जाणाऱ्या विविध साधनांची योग्य निगा राखण्याचं काम ऑप्टोमेट्रिस्टकडे असतं. ऑप्टोमेट्रिस्ट होण्यासाठी उमेदवार बारावी सायन्स फिजीक्स, केमिस्ट्री, मॅथ्स किंवा बायोलॉजी हे विषय घेऊन ५० टक्के गुणांसह उत्तीर्ण व्हावा लागतो.



ऑप्टोमेट्रिस्टीमध्ये बॅचलर डिग्री किंवा डिप्लोमा कोर्स करता येऊ शकतो. या डिप्लोमा कोर्सचा कालावधी दोन वर्षांचा तर डिग्री कोर्सचा कालावधी चार वर्षांचा असतो. यामध्ये एक वर्षाचा प्रशिक्षण कालावधी समाविष्ट असतो. या विषयाशी संबंधित शिक्षण पूर्ण केल्यानंतर ऑप्थोमोलिस्ट म्हणून कोणत्याही शोरुममध्ये काम करण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. या शिवाय ऑप्थल्मिक लेन्स मॅन्युफॅक्चरिंग युनीट सुरु करता येतं. कॉन्टॅक्ट लेन्स, लेन्स इंडस्ट्री किंवा डोळ्यांशी संबंधित उत्पादनं तयार करणाऱ्या कंपनीमध्ये संधी आहे. नेत्रतज्ज्ञांना हाताखाली ट्रेंड ऑप्टीशियनची गरज असते. त्यामुळे डोळ्यांच्या दवाखान्यात कामाची संधी उपलब्ध होऊ शकते. या विषयाचं शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स, नवी दिल्ली. दिल्ली पॅरामेडिकल अँड मॅनेजमेंट इन्स्टिट्युट, नवी दिल्ली यांचा समावेश होतो.

खेचाखेची

## कलर पसंती

एकदा शहरातील भर चौकात ऐन गर्दीच्या वेळी एका महिलेची कार बंद पडते. त्यावेळी नुकताच सिग्नल लागलेला असतो. नंतर हिरवा सिग्नल लागला तेव्हा गाडी बंद होती, सिग्नल पिवळा होऊन परत तांबडा झाला तरी गाडी काही केल्या सुरू होईना.

हे सारं पाहत फुटपाथवरून चालणारे काका मोठ्याने ओरडले, 'काय हो, कुठलाच कलर पसंत पडत नाहीये का तुम्हाला?'

वेगळे काही

थाई, चायनिज, जॅपनीज, मॅक्सिकन खाद्यसंस्कृती आपल्या जिभेचे चोचले पुरवत आहे. आज आपल्याकडे विदेशी खाद्यपदार्थ लोकप्रिय होत आहेत तर विदेशांमध्ये भारतीय पदार्थ खवैय्यांच्या पसंतीस उतरत आहेत. * लिट्टी चोखा हे एक बिहारी पक्वान्न. कॅलरीजची कमी मात्रा आणि फायबरयुक्त असल्यानं हे पक्वान्न आरोग्यवर्धक समजलं जातं. विदेशी नागरिकांकडून याला पसंतीची पावती मिळत आहे. * विविध देशांमध्ये प्रशस्तीपत्रक मिळवणारा आणखी एक पदार्थ म्हणजे उपमा. सिंगापुरमध्ये आयोजित वर्ल्ड स्ट्रीट फूडमध्ये उपम्याला अनेकांनी पसंती नोंदवली.

मेक अप मंत्रा

## काजळ लावताय?

आपल्याकडे फार पूर्वीपासून काजळाचा वापर होत आला आहे. सध्याच्या बदलत्या आणि आधुनिक काळातही अनेक महिला काजळ वापरत असल्याचं दिसतं. मस्कारा किंवा लायनरप्रमाणे काजळ लावणं फारसं किचकट नसतं. म्हणून तरूणी आणि महिलांची काजळ लावण्याला पसंती असते. मात्र, चुकीच्या पद्धतीने काजळ लावल्यास लूक बिघडू शकतो. त्यामुळे काजळ लावण्याचं तंत्र समजून घ्यायला हवं.



* काजळ लावण्याची विशिष्ट पद्धत आहे. काजळ डोळ्यांच्या कडांवरून बाहेरच्या बाजूला लावणं योग्य ठरतं. * काजळ लावण्याआधी टिश्यू पेपरने डोळे नीट पुसून घ्या. पापण्यांलगत थोडी पावडर लावा. कंसिलरही लावता येईल. * काजळ लावताना पापण्या ताणू नका. पापण्या ताणल्यामुळे काजळाची रेष वाकडी होण्याची शक्यता वाढते. आरशात बघून एक डोळा बंद करून काजळ लावा. * डोळे छोटे असतील तर काजळाची जाड रेष लावू नका. यामुळे डोळे जास्तच छोटे दिसतील. * कोरडं काजळ लावू नका. पेन्सिल काजळ लावत असाल तर टोक काढून घ्या. * काजळ लावून तुम्ही स्मोकी लूक मिळवू शकता. पण डोळ्यांखाली काळी वर्तुळं असतील तर स्मोकी लूक कॅरी करू नका.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

» Selected

## आधीच बिबट्याचे भय, त्यात भटक्या कुत्र्यांची भर

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील काठापूर बुद्रुक येथील भोकरवाडी मध्ये भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात महिला शेतकरी भामाबाई प्रभाकर करंडे यांच्या एका शेळीचा व दोन करडांचा मृत्यू झाला असून, एक शेळी जबर जखमी झाली असून तीही मृत्यूच्या दारात ऊभी आहे. गावात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून प्रशासनाने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी स्थानिक



ग्रामस्थांनी केली आहे. सध्या आंबेगाव तालुक्याच्या विविध गावांमध्ये भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. एकंदरीतच तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर हॉटेल्स, धाबे वाढलेले आहेत. या ठिकाणचे शिळे अन्न फेकून दिले जाते. या अन्नावर अनेक भटकी कुत्री जगत असतात. तसेच गावांमध्ये अनेक भटकी कुत्री वावरत असतात. परंतु ही कुत्री अन्न मिळाले नाही तर टोळीने इतरत्र हिंडत असतात. अशावेळी अनेक पाळीव प्राण्यांवर हि कुत्री हल्ले करतात. काठापूर बुद्रुक येथील भोकरवाडी मध्ये गुरुवारी (दि. १६) सायंकाळी चार वाजता घरासमोर बांधलेल्या दोन मोठाल्या शेळ्या व दोन करडांवर कुत्र्यांनी हल्ला केला. त्यात एक शेळी व दोन करडे जागीच ठार झाली, तर एका शेळीला जबर दुखापत झाली असून ही शेळी वाचण्याची कुठली शक्यता नाही. कुटुंबातील सर्व सदस्य शेतात शेतीकाम व पिकाला पाणी भरण्यासाठी गेले असता, घरासमोर बांधलेल्या शेळ्यांवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केला. शेळ्यांच्या आवाजाने रस्त्यावरुन जाणारी विद्यार्थीनी रिद्धी करंडे हिने शेजारील लोकांना बोलावून कुत्री हुसकावून लावली. परंतु तोपर्यंत कुत्र्यांच्या केलेल्या हल्ल्यात दोन करडांचा जागीच मृत्यू झाला होता, तर एक काही तासांनी दगावली.

# चाकण- शिक्रापूर रस्त्याचे काम लालफितीत

## अनेक निरपराध मृत्यूच्या दाढेत, जड वाहनांची अव्याहत वाहतूक सुरूच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** तळेगाव- चाकण ते शिक्रापूर रस्त्याचे काम मागील अनेक वर्ष लालफितीत अडकून पडले आहे. तळेगाव, चाकण, रांजणगाव आदी एमआयडीसी याच रस्त्यावर असल्यामुळे या रस्त्याने नेहमीच अवजड वाहनांची वर्दळ असते. पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्ग आणि तळेगाव- चाकण- शिक्रापूर महामार्गावर प्रचंड वाहतूक अव्याहतपणे सुरु आहे. अवजड वाहतुकीचे कंटेनर, ट्रेलर आणि गॅसची वाहतूक करणारे एलपीजी टँकर धोक्याचा बावटा दाखवीत धावत आहेत. मात्र मागील वीस वर्षांपासून येथील तळेगाव ते शिक्रापूर दरम्यानच्या महामार्गाचे काम घोषणांच्या पुढे सरकलेले नाही.

उर्से, तळेगाव, चाकण, शिक्रापूर, रांजणगाव एमआयडीसी आणि मराठवाडा, विदर्भ व मावळ, मुंबईकडे जाण्यासाठीचा जवळचा मार्ग म्हणून तळेगाव- चाकण- शिक्रापूर या ५६ किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर वाहनांची संख्या मागील काही वर्षांत वाढली आहे. मावळ तालुक्यातील माळवाडी, इंदोरी बायपास, भंडारा डोंगर, सुधा पूल ते खेड तालुक्यातील महाळुंगे , खालुंब्रे, शेलपिंपळगाव , साबळेवाडी, बहुळ आदी ठिकाणी अरुंद रस्ते , तीव्र उतार व धोकादायक वळणे असून, अपघातप्रवण क्षेत्रे आहेत. तळेगाव चाकण शिक्रापूर रस्त्याचे काम निविदा स्तरावर असल्याचे सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्ष जागेवर अजून काडीही हललेली नाही.



चाकण शिक्रापूर रस्त्यावर अव्याहतपणे सुरु असलेली अवजड वाहतूक. (छाया : रत्नेश शेवकरी, चाकण)

अरुंद रस्ते, वाढती अतिक्रमणे व अवजड वाहनांची रहदारी यामुळे चाकण औद्योगिक परिसराचा श्वास कोंडला आहे. अवजड वाहतुकीला सकाळी सायंकाळी काही वेळ बंदी आणि अतिक्रमण कारवाई करून काही प्रमाणात त्यावर उपाययोजना करण्याचा प्रयत्न झाला. मात्र तो फारसा परिणाम कारक ठरलेला नाही. अवजड वाहतूक अव्याहतपणे सुरूच आहे. अवजड वाहतुकीने सतत होणा-या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना वारंवार अपघातांना सामोरे जावे लागते. आजवर अनेकांचे बळी गेल्याच्या नोंदी पोलीस दप्तरी आहेत.

अवजड वाहने अहोरात्र तळेगाव- चाकण ते शिक्रापूर महामार्गावर नियम तोडून बिनदिक्कतपणे शहरात प्रवेश करतात. प्रशासन मात्र केवळ बघ्याची भूमिका घेत आहे.

### उखळात डोकं आणि मुसळाची भीती

● अवजड वाहन चालकांच्या संघटना अत्यंत वरपर्यंत हातबांधणी करतात. त्यामुळेच अशा वाहनांकडून अपघात झाल्यानंतर सुद्धा त्यांना झुकते माप देण्याचे पाप प्रशासन करत असल्याचा नागरिकांचा अनुभव आहे. अवजड वाहन चालक बिनधास्त अपघात करून पळून जातात. अवजड वाहन चालकांच्या मालकांचे नेमके कुणाशी आर्थिक लागेबांधे आहेत ? हा प्रश्नच अनेक उत्तरांचा धनी आहे. गुरुवारी (दि. १६ ) हरियाणा येथून अकिब खानच्या रूपाने आलेला संतोष माने पुन्हा कधीच येणार नाही, असे कुणीही छातीठोकपणे सांगूच शकत नाही. अपघातांचे 'डाय वे' म्हणून लौकिक असलेल्या येथील महामार्गावरून जाताना उखळात डोकं आणि मुसळाची भीती उक्तीप्रमाणे सामान्य नागरिकाची अवस्था होत आहे. पण प्रशासन आणि शासनाला त्याचे काहीही सोईरसुतक नसल्याची नागरिकांची भावना आहे.

## अपघातसमयी धाडसी कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान



**शिक्रापूर :** शिक्रापूर चाकण रस्त्यावर कंटेनरच्या अपघाताचा पंचवीस किलोमीटरचा थरार नुकताच घडला असताना. यावेळी कंटेनरला रोखून पुढील अनर्थ टाळत जमावाच्या गराड्यातून चालकाला वाचवून कंटेनरसह त्यामधील नवीन पाच कारचे रक्षण करण्यासाठी पुढाकार घेत धाडसी कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचारी व पोलीस मित्रांचा नुकताच पोलीस पाटलांच्या वतीने सन्मान करण्यात आला. चाकण शिक्रापूर रस्त्यावर १६ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास चाकण बाजूकडून मद्यधुंद अवस्थेत आलेल्या कंटेनर चालकाने दोन महिलांना ठोकर देत शिक्रापूर गाठले. त्यावेळी समोर येईल त्या वाहनांना धडक देत पंधराहून अनेक वाहनांचे नुकसान केले. जातेगाव खुर्द येथे कंटेनरला रोखण्यात पोलीस अधिकारी, कर्मचारी व पोलीस मित्रांना यश आले, मात्र तेथे जमलेल्या संतप्त जमावाने कंटेनरवर दगडफेक करत चालकाला दगड व काठ्यांनी मारहाण सुरु केली. दरम्यान पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, पोलीस हवालदार आत्माराम तळोले, अमोल दांडगे, शिपाई लखन शिरसकर व पोलीस मित्र शेरखान शेख, संदीप उर्फ दत्ता खलाटे, पोलीस पाटील कृष्णा गजरे यांनी धाडस दाखवत तत्परतेने जखमी कंटेनर चालकाला पोलीस वाहनात टाकून रुग्णालयात हलवले. यावेळी संतप्त जमाव अपघातग्रस्त कंटेनर पेटवून देण्याच्या तयारीत असताना जमावाला शांत देखील केल्याने पुढील अनेक अनर्थ टळला.

# बिबट्याच्या हल्ल्यात तरुण जखमी

## थोरांदळे (ता. आंबेगाव) येथील डोंगर मळ्यातील घटना

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** थोरांदळे (ता. आंबेगाव) येथील डोंगर मळ्यात वेस्टर्न हिल कंपनीजवळ दुचाकीवरून घरी चाललेल्या तरुणावर, दूध घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला केला. बिबट्याचा पंजा शेतकऱ्याच्या दुचाकीवरिल दूधाच्या किटलीवर लागल्याने शेतकरी बचावला. परंतू त्यानंतर पुन्हा बिबट्याने दुसऱ्या दुचाकीवर झेप घेत तरुणाच्या गुडघ्यावर बिबट्याने पंजा मारल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. या हल्ल्यात जाधववाडी येथील कमलेश रामदास जाधव हा तरुण जखमी झाला आहे. ही घटना शनिवारी (दि. १८) रोजी रात्री साडेसात वाजता घडली. मंचर येथील उपजिल्हा ग्रामिण रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या हल्ल्यामुळे दुचाकीस्वारांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, जाधववाडी येथिल कमलेश रामदास जाधव हा तरुण पिंपळगाव (खडकी) येथून आपला मावसभाऊ राहुल सिताराम जगदाळे यांच्या समवेत दुचाकीवरून जाधववाडीकडे चालले होते. थोरांदळे गावातील डोंगर मळ्यात वेस्टर्न हिल कंपनी जवळ बिबट्याने अचानक येऊन दुचाकी वरील कमलेश जाधव यांच्या गुडघ्यावर पंजा मारला. परंतू अंधारामुळे त्यांच्या लक्षात आले नाही. ते जाधववाडी येथील आपल्या घरी गेले असता पायावर रक्तस्त्राव होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात धाव घेतली. दरम्यान डोंगर मळ्यातील दूध उत्पादक शेतकरी दशरथ सुदाम टेमगिरे हे सायंकाळी सव्वा सात वाजण्याच्या सुमारास गावातील शिवशंकर दुधाच्या डेअरी दूध घालण्यासाठी निघाले होते. त्यावेळी दबा धरून बसलेल्या बिबट्याने दशरथ टेमगिरे यांच्या दुचाकीवर झेप घेतली. परंतु बिबट्याचा पंजा दुधाच्या किटलीवर लागला. त्यामुळे दशरथ टेमगिरे थोडक्यात बचावले. परंतू त्यानंतर पुन्हा कमलेश जाधव यांच्या दुचाकी वर बिबट्याने हल्ला केला. त्याच्या मागे चाललेल्या रिक्षा चालकाने बिबट्याला समक्ष पाहिले होते. त्यानंतर ऋतुजा निघोट यांनी देखील बिबट्याला समक्ष पाहिले होते.



जाधववाडी (ता. आंबेगाव) येथील तरुण कमलेश जाधव या तरुणावर बिबट्याने हल्ला करून जखमी केले.

तरुण व शेतकऱ्यावर झालेल्या हल्ल्याची खबर तेथे राहणाऱ्या थोरांदळे गावच्या पोलीस पाटील वैशाली टेमगिरे यांनी वनविभागाला कळविली. वनरक्षक सूर्यकांत कदम यांनी रात्री साडेनऊ, पावणेदहा वाजण्याच्या सुमारास घटनास्थळी भेट दिली असता त्यांना देखील त्याच ठिकाणी मादीसह बछडा दिसला. या घटनेमुळे जाधववाडी, थोरांदळे परिसरात दुचाकीस्वार, वाहन चालकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.जखमी झालेल्या कमलेश जाधव याच्यावर मंचर उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय उपचार सुरू आहेत.

# नारायणगाव अपघात, टेम्पोचालकाला अटक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** पुणे-नाशिक महामार्गावर भीषण अपघात झाला होता. सुसाट टेम्पोच्या धडकेत प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाडीमधील नऊ प्रवाशांचा मृत्यू झाला होता. अपघात करून घटनास्थळावरुन पळ काढलेल्या टेम्पोचालकाला पोलिसांनी अखेर चाकण परिसरातून अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, टेम्पोचालक रोहितकुमार जगमालसिंग चौधरी (वय ३०, रा. मोहमदपूर जाट, ता. बावल, जि. रेवाडी, हरयाणा) हा अपघातानंतर पसार झाला होता. आता पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. एसटी बसचालकाने रस्त्यावर अयोग्यरित्या बस उभी केल्यामुळे भाऊसाहेब भास्कर जायभाये यालाही अटक करण्यात आली आहे. अशी माहिती नारायणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली आहे. या प्रकरणाबाबत अधिक माहिती अशी कि, आरोपी टेम्पोचालक चौधरी याला तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. एसटी बसचालक जायभाये यांना



न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. भरधाव टेम्पोने प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाडीला धडक दिली होती त्यात नऊ जनांचा मृत्यू झाला होता. दिल्याने झालेल्या भीषण अपघातात नऊ जण ठार झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी पुणे-नाशिक महामार्गावरील नारायणगाव परिसरात घडली. या अपघातात आठ जण गंभीर जखमी झालेत तर नऊ जणांचा मृत्यू झाला आहे.

पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी घटनास्थळी जाऊन भेट दिली. अपघातानंतर पसार झालेल्या टेम्पोचालकाला अटक करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पोलीस अधीक्षक देशमुख, अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे तपास शाखेच्या पोलिसांनी तपास करुन टेम्पोचालक रोहितकुमार चौधरीला चाकण परिसरातून बेड्या ठोकल्या.

## दहा महिन्यांपूर्वीच्या खुनाची उकल

**शिक्रापूर :** जातेगाव खुर्द (ता. शिरुर) हद्दीमध्ये मार्च २०२३ मध्ये एका अनोखी इसमाचा खून करुन पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने टाकून दिलेल्या मृतदेहाची ओळख पटवून खुनाचा गुन्हा उघड करत आरोपींना तब्बल दहा महिन्यांनी पोलिसांनी जेरबंद केले असून रमेश वामन हरगुडे, निलेश धनाजी परदेशी, तकतलाल उर्फ प्रताप देवाजी नट व अनिता अंकुश नानावत असे पोलिसांनी जेरबंद केलेल्या आरोपींची नावे आहे. जातेगाव येथे ११ मार्च २०२३ रोजी चासकमान कालव्यामध्ये एका इसमाचा मृतदेह मिळून आलेला असताना पोलिसांच्या तपासा दरम्यान सदर मृतदेह माधव दशरथ करडे (वय ४०, रा. चुंब ता. बार्शी जि. सोलापूर) याचा असल्याचे आणि त्याचा खून झाल्याचे समोर आले, दरम्यान पोलिसांनी सखोल तपास केला असता माधव करडे याचा एका ठिकाणी दारू पीत असताना रमेश हरगुडे याच्या सोबत वाद झाल्याने, रमेशने डोक्यात काठीने मारहाण करत खून केला आणि नंतर दारु व्यवसाय करणाऱ्या महिलेसह अन्य तिघांच्या मदतीने मृतदेह खुनाचा पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने चासकमान कालव्यात टाकला होता. या गुन्ह्याचा तपास करत असताना पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र पानसरे, पोलीस हवालदार श्रीमंत होनमाने, अमोल दांडगे, विकास पाटील, रोहिदास पारखे, शिवाजी चितारे, जयराज देवकर यांनी रमेश हरगुडे याला ताब्यात घेत चौकशी केल्यानंतर सदर प्रकार उघडकीस आला. यावेळी रमेश याने माधव करडेचा खून केल्यानंतर अनिता नानावत हिने मृतदेह पाहिल्यानंतर अन्य लोकांना बोलावून मृतदेह पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने कालव्यामध्ये टाकून दिल्याचे सांगितले. दरम्यान पोलिसांनी रमेश वामन हरगुडे (४६), निलेश धनाजी परदेशी (२१), अनिता अंकुश नानावत (४६. तिघे रा. गव्हाळे वस्ती, सणसवाडी), तकतलाल उर्फ प्रताप देवाजी नट (४०, रा. सराटे वस्ती, सणसवाडी) यांना अटक केली तर त्यांच्या एका साथीदाराचा शोध सुरु आहे.

# एमआयडीसीतील रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** कारेगाव,ता.शिरुर येथे दर रविवारी भरणारा आठवडे बाजार रांजणगाव एमआयडीसीतील रस्त्यांवरून हटविण्यात आला असून, एमआयडीसीतील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतल्याने कंपनी प्रतिनिधी व कामगारांनी समाधान व्यक्त केले.

कारेगाव येथे दर रविवारी भरणारा आठवडे बाजार कारेगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीसह रांजणगाव एमआयडीसीतील प्रमुख व अंतर्गत रस्त्यावर भरत असल्याने या रस्त्यावरुन विविध कंपन्यातील मालवाहतूक व कामगारांना ने आण करणारी वाहने यांना ये जा करणे मुश्किल झाले होते,तसेच बाजाराच्या दिवशी दुपारनंतर या रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती. त्यामुळे या रस्त्यावर भरणारा आठवडे बाजार हटवून हे रस्ते मोकळे करण्याची मागणी एमआयडीसीतील विविध कंपनी प्रतिनिधीसह वाहनचालकांनी एमआयडीसी कार्यालय, रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाणे व कारेगाव ग्रामपंचायतीकडे सातत्याने केली होती,याची दखल घेऊन आज रांजणगाव एमआयडीसी कार्यालय व एमआयडीसी पोलिस ठाणे यांनी केलेल्या संयुक्त कारवाईत आठवडे बाजार रस्त्यावरुन हटविल्याने रस्ते मोकळे झाले, त्यामुळे वाहनचालकांची गैरसोय दूर होणार असून,आठवडे बाजार हटविल्याने कंपनी प्रतिनिधी व वाहनचालक यांनी समाधान व्यक्त केले. याबाबत ग्रामपंचायत अधिकारी किसन बिबे यांनी सांगितले कि, एमआयडीसीमुळे परिसरातील गावात दिवसेंदिवस वाढत्या नागरिकीकरणामुळे येथील बाजाराला जागा अपुरी पडत आहे.

## अतिक्रमण हटवले...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



रांजणगाव गणपती रांजणगाव एमआयडीसी,ता.शिरुर येथील आठवडे बाजार हटविण्यात आल्याने रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे.

# कांद्याच्या आवकेत घट; दरात किंचित वाढ; फळभाज्यांसह पालेभाज्यांची प्रचंड आवक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये बटाटा, गाजर, वाटाणा व हिरव्या मिरचीची विक्रमी झाली. पालेभाज्यांची भरपूर आवक झाल्याने त्यांचे भाव कोसळले आहेत. एकूण उलाढाल ५ कोटी ६० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक २,००० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ३,००० क्विंटलने घटली. कांद्याचा कमाल भाव ३,००० रुपयांवर पोहोचला. बटाट्याची एकूण आवक ३,००० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक १,००० क्विंटलने वाढली. बटाट्याचा कमाल भाव २,००० रुपयांवर स्थिरावला. लसणाची एकूण आवक २५ क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक स्थिर राहिली. लसणाचा कमाल भावही २५,००० रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३७० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार ५०० रुपयांपासून ते ५ हजार ५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला.




**जनावरे :** चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ५५ जर्शी गाईपैकी ३८ गाईची विक्री झाली.( १०,००० ते ४०,००० रु.), १७० बैलांपैकी १४० बैलांची विक्री झाली.( १०,००० ते ४०,००० रु.), १२० म्हशीपैकी ११० म्हशींची विक्री झाली.( २०,००० ते ८०,००० रु.), ११ हजार ६२० शेळ्या - मेंढ्यापैकी ११,१०० शेळ्यांची विक्री झाली. ( २,००० ते १५,००० रु.).

### फळभाज्या :

● फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे :

● टोमॅटो - ३३८ क्विंटल ( ५०० ते १,२०० रू. ), कोबी - २६० क्विंटल ( ४०० ते ६०० रू.), फ्लॉवर - २६५ क्विंटल ( ६०० ते ८०० रु.), वांगी - ८३ क्विंटल ( २,००० ते ३,५०० रु.), भेंडी - ८३ क्विंटल ( ३,००० ते ४,५०० रु.), दोडका - ६२ क्विंटल ( ४,००० ते ५,००० रु.), कारली - ७२ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), दुधीभोपळा - ६१ क्विंटल ( १,००० ते २,५०० रु.), काकडी - १०७ क्विंटल ( १,००० ते २,००० रु.), फरशी - ५२ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), वालवड - ६२ क्विंटल ( ३,००० ते ६,००० रुपये), ढोबळी मिरची - १७२ क्विंटल ( ३,००० ते ५,००० रु.), चवळी - ४६ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), शेवगा - ३० क्विंटल ( ६,००० ते ८,००० रु.), गाजर - २५० क्विंटल ( २,००० ते २,५०० रु.), गवार - ४० क्विंटल ( ६,००० ते ९,००० ), वाटाणा - ३७५ क्विंटल ( ३,५०० ते ४,०००), आले - १९० क्विंटल ( ३,००० ते ५,००० ).

### शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे

**:** कांदा - एकूण आवक - २,००० क्विंटल. भाव क्रमांक - १. ३,००० रुपये, भाव क्रमांक २. २,५०० रुपये, भाव क्रमांक ३. २,००० रुपये.

● बटाटा - एकूण आवक - ३,००० क्विंटल. भाव क्रमांक १. २,००० रुपये, भाव क्रमांक २. १,६०० रुपये, भाव क्रमांक ३. १,२०० रुपये.

**पालेभाज्या :** चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे -

● मेथी - एकूण १८ हजार ५४० जुड्या ( १,००० ते १,४०० रुपये ), कोथिंबीर - एकूण ३९ हजार ५०० जुड्या ( २०० ते ५०० रुपये,), शेपू - एकूण ४ हजार ९५० जुड्या ( ५०० ते ७०० रुपये ), पालक - एकूण ३ हजार ८६० जुड्या ( ३०० ते ६०० रुपये).



# कॅलिडोस्कोप



## आस वळीवाची...

असे बरसते ऊन
तृणही न राहिले एक
भेगाळल्या या धरेचे
क्लांत नि:श्वास ऐक
रे घना आता
विलंब नको पळाचा
नभी दाटून कुंभ
वर्षाव हो वळीवाचा

## टेस्लाची कार बदलली बैलगाडीत!

एका व्यक्तीने चक्क ४० लाख रुपये किमतीची टेस्ला कंपनीची कार बैलगाडीमध्ये बदलली आहे. 'टेस्ला'ची कार जगभरामध्ये चर्चेत आहे. या कारला तिच्या फीचर्समुळे जगभर पसंती दिली जाते, तसेच या गाडीला खूप मागणी आहे; पण आता चीनमधील एक व्यक्ती याच टेस्ला कारवर इतकी नाराज झाली, की त्याने टेस्लाच्या कारचे बैलगाडीत रूपांतर केले.

चीनमधील एका व्यक्तीने सेकंड हँड टेस्ला मॉडेल ३ विकत घेतले. तिची किंमत १०१,००० युआन (११ लाख रुपये) आहे; परंतु ती खरेदी केल्यानंतर त्याला समजले की, ते चार्ज करणे शक्य नाही. त्याच्या या तक्रारीवर कोणताही तोडगा न निघाल्याने त्याने संतप्त होऊन बैलासह गाडी



ओढून निषेध केला. चीनमधील टेस्लाच्या अधिकृत वेबसाइटनुसार, चीनमध्ये या मॉडेलची सध्याची किंमत ३३५,९०० युआन (सुमारे ४० लाख रुपये) पासून सुरू होते. कार घेतल्यानंतर, जेव्हा ती व्यक्ती गाडी चालवत होती, तेव्हा त्याला समजले की, कारमध्ये काही समस्या आहे. त्यामुळे ती चार्ज होऊ शकली नाही. गुआजी नावाच्या कंपनीच्या मदतीने या व्यक्तीने कार खरेदी केली होती. गुआजीने २३ ऑक्टोबर रोजी एक अधिकृत निवेदन जारी केले की कार विकणारा एक कार डीलर होता आणि त्याने सुमारे ३० वेळा हीच कार विक्री आणि खरेदी केली होती.

## हनीट्रॅपच्या माध्यमातून एडस्!

आजकाल हनी ट्रॅपच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. त्याच्या जाळ्यात अनेक तरुण–तरुणी अडकले. नुकतीच उत्तराखंडमधून एक धक्कादायक बातमी समोर आली. ड्रग्जच्या आहारी गेलेल्या प्रियकरासह एकूण २० जण एचआयव्ही पॉझिटिव्ह झाले. हा प्रकार उघड झाल्याने खळबळ उडाली आहे.



उत्तराखंडमधील नैनिताल जिल्ह्यातील रामनगर भागात ही घटना उघडकीस आली. अवघ्या पाच महिन्यांमध्ये १९ जणांना एचआयव्हीची लागण झाल्याचे आढळून आले. मिळालेल्या माहितीनुसार, गुलरघाटी परिसरातील १७ वर्षीय तरुणीला अंमली पदार्थांचे व्यसन होते. ती ड्रग्ससाठी हतबल व्हायची तेव्हा ती मुलांना बोलावायची. तिच्या संपर्कामुळे अनेक मुलांना एचआयव्हीची लागण झाली. यामध्ये १५ महिलांचा समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे.

नैनिताल जिल्ह्यामध्ये एचआयव्ही पॉझिटिव्ह प्रकरणे वाढत आहेत आणि रामनगर सर्वात वाईट आहे. रामनगरमध्ये १७ महिन्यांत ४५ लोक एचआयव्ही पॉझिटिव्ह आढळले. एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत १९ जणांना एचआयव्हीची लागण झाली आहे. यामध्ये ३० पुरुष आणि १५ महिलांचा समावेश आहे. ३० पुरुषांपैकी २० तरुणांना सिडिक पदार्थ सेवन केलेल्या आईच्या संपर्कात आल्याने संसर्ग झाला होता. मिळालेल्या माहितीनुसार, रामनगर येथे राहणारी अल्पवयीन मुलगी सिडयुक्त पदार्थ प्राशन करून शहरातील कोणत्याही गल्लीबोळात बिनधास्तपणे फिरताना दिसत आहे. ड्रग्जसाठी पैसे गोळा करण्यासाठी तिने लोकांना आमिष दाखवून शरीरसंबंध करायला लावले.

## डेटवर जाणे पडले महागात!

गाझियाबादमधील एक तरुण डेटवर गेल्यावर फसवणुकीचा बळी ठरला आहे. एका व्यक्तीने सांगितले, की तो डेटला जाणार होता. मेसेजमध्ये त्याला कौशांबी या मेट्रो स्टेशनवर भेटायला बोलावले. मात्र तिथे त्याच्यासोबत असे काही घडले, ज्यामुळे त्याचा जीव धोक्यात आला. स्टेशनवरून त्या व्यक्तीला कौशांबी हॉटेलच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या टायगर कॅफेमध्ये नेण्यात आले. कॅफेमध्ये पोहोचल्यावर, त्या



कनेक्टिव्हिटी होती ना कोणताही साइनबोर्ड. परिस्थिती गडबड असल्याचे लक्षात येताच त्याने ताबडतोब त्याचे लाईव्ह लोकेशन आपल्या मित्रासोबत शेअर केले आणि मेसेजद्वारे संपूर्ण परिस्थिती सांगितली. नंतर कॅफेच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्यासमोर १६,४०० रुपयांचे बिल ठेवले. जे मुलीने ऑर्डर केलेल्या कोल्ड्रिंकचे बिल होते. त्यासाठी त्याने नकार दिल्याने कर्मचाऱ्यांनी त्याला बाहेर जाण्यापासून रोखले आणि जबरदस्तीने ५० हजार रुपयांची मागणी केली. चांगली गोष्ट म्हणजे त्याने सर्व परिस्थिती आपल्या मित्राला सांगितली होती. त्यामुळे त्याच्या मित्राने पोलिसांशी संपर्क साधला आणि लगेच कारवाई करण्यात आली. या कारवाईत डेटिंग घोटाळ्यात सहभागी असलेल्या एका गटाचा पर्दाफाश करण्यात आला. त्यांनी वेगवेगळ्या डेटिंग ॲप्सवर प्रोफाइल तयार केले होते. ती अज्ञात पुरुषांना टायगर कॅफेमध्ये घेऊन जायची, जिथे त्यांच्याकडून खाण्यापिण्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसे आकारले जात होते. यानंतर संपूर्ण रक्कम भरेपर्यंत लोकांना ओलीस ठेवण्यात येत होते.

## इथे आहेत मृतदेह आणि मम्मी

एखाद्या संग्रहालयात गेल्यावर ममी आणि मृतदेहांचं प्रदर्शन बघायला मिळालं तर? इटलीतल्या सिलसिली या बेटावरच्या पालेर्मो कॅपुचिन संग्रहालयात ममी आणि मृतदेहांचा संग्रह करण्यात आला आहे. त्यामुळे या संग्रहालयात जरा जपूनच पाऊल ठेवायला हवं. इथे आठ हजार मृतदेह आणि १२५२ ममी आहेत. सोळाव्या शतकात



ख्रिस्ती भिक्षूकांनी या परिसरात मृतदेह पुरण्याचं तसंच ममी तयार करण्याचं काम सुरू केलं होतं. आज जिथे संग्रहालय आहे. त्याचं रूपांतर संग्रहालयात करण्यात आलं. या मृतदेहांना ममीच्या माध्यमातून सुरक्षित ठेवण्यात आलं. १९२० पासून या भागात मृतदेह पुरण्याचं काम बंद करण्यात आलं आणि संग्रहालयाच्या निर्मितीला वेग आला. या विचित्र संग्रहालयाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी ख्रिस्ती भिक्षुकांकडेच आहे. यातल्या काही ममी पूर्ण अवस्थेत आहेत तर काहींची अवस्था बिकट झाली आहे. इजिप्तमधल्या ममी खूप प्रसिद्ध आहेत. मात्र ममी हा शब्द अरबी भाषेतल्या मुमियापासून तयार झाला आहे. मुमिया म्हणजे मेणाच्या लेपात सुरक्षित ठेवण्यात आलेल्या चीजवस्तू. ममी तयार करण्यासाठी ७० दिवसांचा कालावधी लागतो. अशा या वस्तूसंग्रहालयात पर्यटकांना थरारक अनुभव घेता येईल हे नक्की.



## पेट्रोल टँकरचा गाईंच्या तस्करीसाठी वापर

गाय तस्करांनी गाईंची तस्करी करण्यासाठी पेट्रोल टँकरचा वापर केला आणि त्यात गायी नेण्यास सुरुवात केली. ही माहिती मिळताच बुलडोझरने कंटेनर फोडला असता लोकांना धक्का बसला. पेट्रोलच्या टँकरमधून गायींची वाहतूक केली जात होती. या ट्रकच्या मागील बाजूस एक पेट्रोल कंटेनर जोडला आहे. तो पाहिल्यानंतर कोणालाही वाटेल, की या ट्रकमधून पेट्रोल किंवा डिझेलचा पुरवठा होत आहे; पण याठिकाणी गाय तस्करांनी गाईची बेकायदेशीर वाहतूक करण्यासाठी पेट्रोल कंटेनरमध्ये त्यांना भरले. बुलडोझरच्या सहाय्याने कंटेनर फोडण्यात आले. आतील गायी पाहून लोक हैराण झाले. बुलडोझरच्या सहाय्याने कंटेनर तोडून गायींची सुटका करण्यात आली. बुलडोझरने कंटेनर फोडताच त्यामध्ये गायींचा कळप होता. त्यांना जबरदस्तीने बांधून घेऊन जात होते. डब्यात ज्या पद्धतीने गायी लपवून ठेवण्यात आल्या आहेत, त्यानुसार हे गोवंश तस्करीचे प्रकरण असून त्याबद्दल लोकांमध्ये तीव्र नाराजी आहे. पोलिसांनी आरोपींची नावे उघड करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## बिनची कमाल

चीनमधला एक धावपटू बेई बिन याने अनोखा विक्रम केला. त्याने उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंतचं २४,११० किलोमीटरचं अंतर धावून पूर्ण केलं. म्हणजे तो अंटार्टिका खंडातून आर्टिक खंडात पोहोचला. हे अंतर त्याने ४३३ दिवसांमध्ये पूर्ण केलं. बेई प्रत्येक दिवशी सरासरी ५६ किलोमीटर अंतर धावला. २४,११० किलोमीटर अंतर म्हणजे ४२ किलोमीटरच्या ५७४ मॅरेथॉन स्पर्धांमध्ये धावणं! या काळात बेई बिन १३ देशांमधल्या ६५ शहरांमधून धावला. यात अमेरिका, कॅनडा, चिली, मेक्सिको, ग्वाटेमाला, कोस्टरिका, अर्जेंटिना, पेरूसारख्या देशांचा समावेश आहे. या धावपटूने मार्च २०१८ मध्ये या प्रवासाला सुरूवात केली. या दरम्यान त्याला निसर्गाच्या आव्हानाला सामोरं जावं लागलं. काही ठिकाणी तापमान उणे दहा अंशांपर्यंत तर काही ठिकाणी ४० ते ४५ अंश सेल्सियस होतं. मात्र प्रतिकूल परिस्थितीतही त्याने हार मानली नाही. एवढा लांबचा पल्ला गाठण्याची तयारी त्याने तीन वर्षांपूर्वीपासूनच सुरू केली. २०११ मध्ये त्याने दहा हजार किलोमीटरचं अंतर पार केलं होतं. त्यामुळे दोन ध्रुवांमधलं अंतरही यशस्वीपणे पार करण्याचा विश्वास त्याला होता. या धावेच्या तयारीसाठी बिनने दररोज ६० ते ७० किलोमीटर धावायचं ठरवलं. दोन ध्रुवांमधलं हे अंतर पार करण्यासाठी बिन पहाटे पाच वाजता धावायला सुरूवात करायचा. थोडी फार विश्रांती घेत तो रात्री ९ वाजेपर्यंत धावायचा. बिनने याआधीही धावण्याचा विक्रम केला आहे. २०११ मध्ये त्याने १५० दिवसांमध्ये दहा हजार किलोमीटरचं अंतर पार केलं होतं. अशा या विक्रमवीर बिनचं कौतुक करावं तेवढं कमी आहे.



## चुकीची पोस्ट केली तर...

सोशल मीडियावर बरीच आक्षेपार्ह विधानं केली जातात. समाजात फूट पाडणाऱ्या पोस्ट्स केल्या जातात. त्यावर अंकुश लावण्यासाठी बरेच प्रयत्न होतात. मात्र ऑस्ट्रिया सरकारने या प्रकरणी दोषी आढळणाऱ्यांना वेगळीच शिक्षा देण्याचं ठरवलं आहे. दोषी लोकांना न्यू आर्ट या एनजीओतर्फे सुरू करण्यात आलेला सहा महिन्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे. २०१८ मध्ये ७३ लोकांनी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. 'डायलॉग इन्स्टेड ऑफ हेट' या नावाचा हा अभ्यासक्रम आहे. पुढच्या दोन महिन्यांमध्ये हा अभ्यासक्रम संपूर्ण देशभरात सक्तीचा करण्यात येणार आहे. चुकीच्या पोस्ट्स प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांविरोधात कोर्टात खटले चालवण्याऐवजी हा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा मार्ग अवलंबण्यात आला आहे. ऑस्ट्रियातल्या राजकीय पक्षाच्या एका नेत्यालाही या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा लागला. या नेत्याने देशातल्या शरणार्थींविरोधात चुकीचं विधान केलं होतं. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर लोकांचे विचार बदलतील आणि ते विवेकी मार्गाने वाटचाल करतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.





## सबकुछ महिला!

महिलांनी सर्वच क्षेत्रात बाजी मारली असली तरी ठराविक कामांमध्ये पुरुषांची मक्तेदारी पहायला मिळते. बांधकाम व्यवसायात आजही महिलांचं प्रमाण खूप कमी आहे. त्यातही महिला रंगकाम, सुतारकाम, गवंडीकाम करत नाहीत. मात्र केरळमधल्या महिलांनी या क्षेत्रातही मुसंडी मारली आहे. काही महिलांनी एकत्र येऊन ऑल वूमन कंस्ट्रक्शन कंपनी स्थापन केली असून या कंपनीतली प्रत्येक जबाबदारी महिलांच्या खांद्यांवर आहे. ३० महिलांनी एकत्र येऊन पिंक लॅडर नावाची कंपनी सुरू केली. पिंक लॅडरला काँट्रॅक्ट दिलं की सर्व महिला कामाला लागतात. बांधकामाच्या साईटवर सर्व महिला काम करताना दिसतात. १ नोव्हेंबर २०१८ या



दिवशी पिंक लॅडरची सुरूवात झाली. आत्तापर्यंत त्यांनी दोन घरांचं बांधकाम केलं आहे. इतर तीन घरांचं कामही पिंक लॅडरला मिळालं असून त्यांचं काम सुरू आहे. पिंक लॅडर ही कंपनी सरकारी योजनेतून सुरू झाली आहे. महिलांना मिळणाऱ्या मानधनाबाबत बराच भेदभाव केला जातो. कामाच्या ठिकाणी महिलांबाबत होणार भेदभाव बघून या महिलांनी कंबर कसली आणि ही बांधकामक्षेत्रातली कंपनी सुरू केली. १०० टक्के साक्षरता असणाऱ्या केरळमधल्या एका मॉलमध्येही सर्व महिला कर्मचारी आहेत. या मॉलमध्ये १०० दुकानं आहेत. या सर्व दुकानांची मालकी महिलांकडे आहे. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने केरळने टाकलेलं हे एक पाऊलच म्हणावं लागेल.

## हे आहेत नवे विद्यार्थी

महाराष्ट्रात मराठी शाळा बंद पडत आहेत. प्रादेशिक भाषेतल्या शाळांचीही हीच अवस्था आहे. शाळा वाचवण्यासाठी, विद्यार्थीसंख्या वाढवण्यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. फ्रान्समध्येही एक शाळा वाचवण्यासाठी भन्नाट उपाय करण्यात आला. या देशातल्या क्रेत्स ऑन बेलडॉन नावाच्या शहरातली ही एक प्राथमिक शाळा आहे. शाळेत फक्त २६१ विद्यार्थी शिक्षण घेत असून इथले काही कक्ष बंद होण्याच्या मार्गावर आहेत. काही पालकांनी शाळेतल्या मुलांच्या घटत्या संख्येबद्दल तक्रारही केली होती. त्यानंतर विद्यार्थीभरतीची मोहीम हाती घेण्यात आली. आता हे नवे विद्यार्थी कोण आहेत, हे जाणून घेतल्यावर तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसेल. या शाळेत मेंढ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. १५ मेंढ्या या शाळेतल्या वर्गांमध्ये बसणार आहेत. या शहराची लोकसंख्या फक्त चार हजार असल्यामुळे शाळेतल्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. शाळेतल्या प्रवेशासाठी स्थानिक मेंढपाळाने मेंढ्या पुरवल्या आहेत. या मेंढ्यांचा जन्मदाखलाही शाळेत सादर करण्यात आला. या मेंढ्यांच्या शाळेतल्या प्रवेशासाठी एक पालक गेल लावेल यांनी पुढाकार घेतला होता. या शाळेत ११ इयत्ता आहेत. इयत्तांची संख्या १० करण्याला त्यांचा विरोध होता. यामुळे प्रत्येक वर्गात २४ ते २६ मुलं बसतील. मुलांची संख्या वाढली की त्यांच्याकडे लक्ष देता येणार नाही, असा आक्षेप गेल यांनी घेतला होता.

## At a Glance

### गाझियाबादमध्ये घराला आग

**गाझियाबाद :** येथील एका घराला शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील तिघांसह चौघांचा झोपेतच होरपळून मृत्यू झाला. लोणी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कांचन पार्क परिसरातील एका बहुमजली इमारतीला आग लागली. अग्निशमन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, लोणी अग्निशमन केंद्रात सकाळी या घटनेची माहिती मिळाली.

### २२ डब्यांच्या ट्रेनची चाचणी यशस्वी

**जम्मू :** काश्मीरला रेल्वेमार्गे देशाच्या उर्वरित भागाशी जोडण्यासाठी नव्याने पूर्ण झालेल्या मार्गावरील पहिली यशस्वी चाचणी रविवारी कटरा ते श्रीनगर रेल्वे स्थानकांदरम्यान धावली. १८ वातानुकूलित डबे, दोन लगेज कॅरियर आणि दोन इंजिन असलेली ही गाडी कटरा रेल्वे स्थानकातून सकाळी आठ च्या सुमारास निघाली आणि रेल्वे अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली चार तासांच्या आत आपल्या गंतव्यस्थानी पोहोचली.

### दहशतवाद्यांचा पाकी चौकीवर हल्ला

**इस्लामाबाद:** पाकिस्तानातील अशांत बलुचिस्तान प्रांतात अज्ञात सशस्त्र दहशतवाद्यांनी एका पोलिस चौकीवर हल्ला करून ती पेटवून दिली. माधम्यातील वृत्तानुसार, मोटारसायकलवरून आलेल्या दहशतवाद्यांनी शनिवारी केच जिल्ह्यातील तुर्बत शहराच्या बाहेरील पोलिस चेकपोस्टवर हल्ला केला.

# इस्रायल-हमास अखेर युद्धबंदी...

## ७ ऑक्टोबर २०२३ नंतर : रक्तरंजित संघर्षावर अखेर तोडगा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जगाचे लक्ष वेधलेल्या इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धबंदी करार रविवारी सुमारे तीन तासांच्या विलंबानंतर लागू झाला. युद्धबंदी कराराच्या अंमलबजावणीत तीन तास झालेल्या विलंबास इस्रायलने हमासला जबाबदार ठरवले आहे. इस्रायलने सांगितले की, स्थानिक वेळेनुसार सकाळी ११:१५ वाजता युद्धबंदी करार लागू झाला.

दरम्यान, हमासने ओलिसांची नावे देण्यास विलंब केलेल्या वेळेत गाझामध्ये इस्रायलने केलेल्या हल्ल्यात आठ जणांचा मृत्यू झाला आहे. इस्रायल आणि हमास यांच्यातील सहा आठवड्यांच्या युद्धबंदीचा पहिला टप्पा रविवारी सकाळी ८.३० वाजता लागू होणार होता. करार अंमलात येण्यापूर्वी, इस्रायलने स्पष्ट केले होते की, हमास ओलिसांची नावे सुपूर्द करत नाही, तोपर्यंत युद्धबंदी लागू होणार नाही. तांत्रिक कारणांमुळे नावे सादर करण्यास विलंब झाल्याचे हमासने म्हटले आहे. तीन तासांनंतर, हमासने तीन ओलिसांची नावे इस्रायलला सोपवली. त्यात तीन महिलांची नावे आहेत. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी त्याला ओलीस ठेवण्यात आले.

हमासकडून नावे मिळण्यास विलंब होत असताना, इस्रायलने गाझा पट्टीत हवाई हल्ले केले. यामध्ये आठ जणांचा मृत्यू झाला. दक्षिण गाझा शहरातील खान युनूस येथील नासेर रुग्णालयाने हल्ल्यातील मृतांची पुष्टी केली. इस्रायलने म्हटले आहे की हमासने सुटका करायच्या असलेल्या ओलिसांची नावे उघड न करून युद्धविराम सुरू होण्यास विलंब केला. युद्धबंदी सुरू झाल्यानंतर सुमारे दोन तासांनी हमासने नावे सुपूर्द केली. या कराराअंतर्गत हमास पहिल्या टप्प्यात ३३ बंधकांना सोडेल आणि त्या बदल्यात इस्रायल ७०० पॅलेस्टिनी कैद्यांना मुक्त करेल. या करारामुळे, दोन्ही पक्ष त्यांच्या सर्वात प्राणघातक आणि विनाशकारी संघर्षाच्या समाप्तीच्या दिशेने एक पाऊल जवळ येत आहेत.



### युद्धबंदी करारात नेमकं काय?

● हमासने टप्प्याटप्प्याने डझनभर ओलिसांना सोडण्यास सहमती दर्शविली आहे. तर इस्रायलने त्यांच्या ताब्यातून शेकडो पॅलेस्टिनी कैद्यांना सोडण्यासही सहमती दर्शविली आहे. या करारावर अमेरिकेचे मावळते राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन म्हणाले की, ' आठ महिन्यांच्या सततच्या वाटाघाटींनंतर प्रशासनाला युद्धबंदी आणि ओलिस करारावर सहमती मिळवण्यात यश आले आहे. हा करार तीन टप्प्यात अंमलात आणला जाईल. युद्धबंदी कराराबाबत कतार, इजिप्त आणि अमेरिकेने बुधवारी एक संयुक्त निवेदन जारी केले आहे. या कराराची अंमलबजावणी १९ जानेवारी २०२५ पासून लागू होईल आणि तीन टप्प्यात शांतता प्रस्थापित करण्याची योजना असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय भागीदारांसोबत एकत्र काम करून ही प्रक्रिया यशस्वी करण्याचे आश्वासन कतार, इजिप्त आणि अमेरिकेने दिले आहे.

गाझामध्ये युद्धबंदी करार होण्यापूर्वी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी हमासला इशारा दिला होता. इस्रायलला युद्ध पुन्हा सुरू करण्याचा अधिकार आहे, असे इस्रायलने म्हटले होते. हमासकडून सोडण्यात येणाऱ्या ओलिसांची यादी मिळत नाही तोपर्यंत ते करारावर पुढे जाऊ शकणार नाहीत. इस्रायल कराराचे कोणतेही उल्लंघन सहन करणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले होते.. गरज पडल्यास, इस्रायल अमेरिकेच्या पाठिंब्याने पुन्हा युद्ध सुरू करू शकतो. आम्हाला सर्व बंधकांना आधी इस्रायलमध्ये परत आणायचे आहे, असेही त्यांनी नमूद केले होते.

७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासच्या दहशतवाद्यांनी इस्रायलच्या अनेक भागांना एकाचवेळी हल्ला केला. या हल्ल्यात सुमारे १२०० इस्रायली नागरिक ठार झाले. तर २५० हून अधिक जणांचे अपहरण करुन त्यांना ओलीस ठेवण्यात आले. यानंतर इस्रायलने गाझावर भीषण हल्ल्यांची मालिकाच सुरु केली. इस्रायली सैन्याच्या हल्ल्यात आतापर्यंत ४५ हजारांहून अधिक पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू झाला आहे. गाझा पूर्णत: बेचिराख झाले आहे.

**अमेरिकेच्या मध्यस्थीने युद्धबंदी करार**

इस्रायल-हमास यांच्या संघर्षवर तोडगा काढण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. मात्र दोन्ही बाजूंनी घेतलेल्या आडमुठ्या भूमिकेमुळे शांततेला छेद बसत होता. अखेर मागील काही दिवसांपूर्वी कतार आणि अमेरिकेने पुन्हा एकदा इस्रायल आणि हमास यांच्यात युद्धबंदी करार सुरू केला. कतारने युद्धात मध्यस्थी केली करत सर्वप्रथम २४ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीत आठवडाभरासाठी युद्धबंदी लागू केली. नोव्हेंबरमध्ये कतारनेही चर्चेतून माघार घेतली. इस्रायल आणि हमास वाटाघाटी करण्यास तयार नसल्याचा आरोप कतारने केला होता. मात्र तरीही शांततेसाठीचे प्रयत्न सुरूच होते. अखेर अमेरिकेनेही युद्धबंदीवर करार करण्याचा आग्रह धरला. डोनाल्ड ट्रम्प यांनीही हमासला ओलिसांना लवकर सोडावे अन्यथा त्याचे गंभीर परिणाम होतील, असा इशाराच त्यांनी दिला. याचा परिणाम झाला. हमासने नमते घेत सर्वप्रथम युद्धबंदी करारावर सहमती दर्शवली. यानंतर इस्रायलनेही याला संमती दिल्यानंतर अखेर युद्धबंदी करार शक्य झाला.

**पहिल्या टप्पा सहा आठवड्यांचा, ओलिसांच्या सुटकेचा**

कराराचा पहिला टप्पा सहा आठवड्यांचा असेल. यामध्ये पूर्ण युद्धबंदी असेल. अमेरिकेचे मावळते अध्यक्ष जो बायडेन यांनी म्हटले आहे की, करारानुसार पहिल्या टप्प्यात हमास ओलिसांना सोडेल. इस्रायलही पॅलेस्टिनी कैद्यांनाही सोडेल. मात्र त्यांनी नेमकी किती ओलिसांची सुटका होणार आहे याबाबतची माहिती दिलेली नाही.

केंद्रीय राखीव पोलीस दलाचे

# ज्ञानेंद्र प्रताप सिंह नवे महासंचालक



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने ज्ञानेंद्र प्रताप सिंह यांची केंद्रीय राखीव पोलीस दलाचे (सीआरपीएफ) नवे महासंचालक (डीजी) म्हणून नियुक्ती केली आहे. शनिवारी रात्री उशिरा जारी करण्यात आलेल्या विभागीय आदेशानुसार केंद्रीय गृहमंत्रालयाच्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने (एसीसी) मंजुरी दिली. विभागीय कार्मिक व प्रशिक्षण (डीओपीटी) यांनी हा आदेश जारी केला आहे. आसाम कॅडरचे १९९१ च्या बॅचचे आयपीएस जीपी सिंह यांची सीआरपीएफच्या महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे, त्या गृह मंत्रालयाच्या प्रस्तावाला एसीसीने मंजुरी दिली आहे."

ज्ञानेंद्र सिंह हे यापूर्वी आसाम चे पोलीस प्रमुख होते. आता ते सीआरपीएफचे प्रमुख म्हणून काम पाहतील. ३१ जानेवारी २०२७ रोजी ते निवृत्त होत आहेत.

**संरक्षण**

सीआरपीएफचे नवे डीजी जीपी सिंह यांनी यापूर्वी स्पेशल प्रोटेक्शन ग्रुप (एसपीजी) आणि राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) सारख्या महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. याशिवाय त्यांनी आसाम पोलिसदलात अनेक वरिष्ठ पदांवरही काम केले आहे.

सीआरपीएफ हे भारतातील सर्वात मोठे निमलष्करी दल असून त्यात सुमारे तीन लाख जवान असतात. जम्मू-काश्मीरमधील दहशतवादविरोधी मोहीम, ईशान्य भारतातील दहशतवादविरोधी मोहीम आणि डाव्या अतिरेक्यांनी प्रभावित झालेल्या राज्यांमध्ये नक्षलविरोधी मोहिमांमध्ये या दलाचा सहभाग आहे.

# उत्तर भारतात पावसाची शक्यता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** उत्तर भारतात थंडीची लाट कायम असली, तरी हवामान खात्याने उत्तर प्रदेशसह अनेक राज्यांमध्ये पावसाचा अलर्ट जारी केला आहे. उत्तर भारतातील डोंगराळ राज्ये आणि मैदानी भागात २२ ते २३ जानेवारी दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान शास्त्र विभागाने वर्तवली आहे. पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, उत्तर प्रदेश राजस्थानमध्ये २२ आणि २३ जानेवारीला पाऊस पडेल, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये किमान तापमान शून्य अंश सेल्सिअसच्या खाली, तर हिमाचल प्रदेशात ते दोन ते पाच अंशांच्या दरम्यान आहे.

# प्रतिमा खराब असल्यास पक्षप्रवेश नाही

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सडेतोड भूमिका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिर्डी :** "जनमानसात ज्याची प्रतिमा खराब असेल अशा लोकांना पक्षात घ्यायचं नाही," अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली आहे. "पक्षातील पदाधिकारी व नेत्यांकडून कोणतेही गैरवर्तन होता कामा नये", अशा सूचना देखील अजित पवार यांनी पक्षाच्या शिबिरातून नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना दिल्या आहेत. अजित पवारांच्या नेतृत्वाखाली शिर्डी येथे चालू असलेल्या पक्षाच्या नव-संकल्प शिबीर - २०२५ या मंथन शिबिरास रविवारी अनेक नेत्यांनी हजेरी लावत पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित केलं.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील या शिबिरास उपस्थित असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना काही महत्त्वाच्या सूचना केल्या.

अजित पवार म्हणाले, "काहीजण असे आहेत जे काहीच कामाचे नाहीत. त्यांना पक्षात घेऊन उपयोगही नाही. उलट त्या लोकांना आपल्या पक्षात घेतल्यामुळे 'या माणसाला पक्षात का घेतलं?' असा प्रश्न जनता उपस्थित करेल. ते पाहून 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात काहीतरी वेगळं चालू आहे' अशी चर्चा लोकांमध्ये होऊ शकते. त्यामुळे जनमानसात ज्याची प्रतिमा खराब आहे अशा माणसाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात घ्यायचं कारण नाही. त्यांना पक्षात अजिबात घ्यायचं नाही. मला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातल्या सगळ्या नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना सांगायचं आहे की संघटनेत काम करणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांकडून कुठलंही गैरवर्तन होता कामा नये. आपल्या नेत्यांमुळे, पदाधिकाऱ्यांमुळे कोणालाही त्रास होता कामा नये.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पुढचा काळ हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राहील. गावागावात, चौकाचौकात आपल्या पक्षाचे कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत. सर्वांनी समन्वयानं कामं केली पाहिजेत. महाराष्ट्राचा विकास सर्वांनी मिळून साधायचा आहे. विधानसभा निवडणुकीनंतर आपली जबाबदारी वाढली आहे. आगामी महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीच्या निमित्तानं उमेदवारीसाठी जे इच्छुक आहेत, त्यांनी एक जबाबदार कार्यकर्ता निवडला पाहिजे आणि त्या कार्यकर्त्यानं २५ घरांवर काम कलं पाहिजे. म्हणजे एका घरात ४ मतं धरली तर, १०० मतं मिळतील. आपल्याला अधिकाधिक तरुणांना पक्षात सामील करून घ्यायचं आहे.

# अखेर डल्लेवाल उपचार घेणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** शेतकरी नेते जगजीत सिंग डल्लेवाल २६ नोव्हेंबरपासून आमरण उपोषण करत आहे. त्यांची प्रकृती देखील खालवत होती, मात्र ते उपचार घेण्यास नकार देत होते. अखेर जगजीत सिंग डल्लेवाल यांनी वैद्यकीय उपचार घेण्याची तयारी दर्शवली आहे.

तत्पूर्वी केंद्र सरकारच्या एका प्रतिनिधीने शनिवारी शेतकरी नेत्यांची भेट घेतली. या बैठकीत शेतकऱ्यांनी १४ फेब्रुवारीला केंद्राच्या प्रतिनिधींशी बोलण्याचे मान्य केले आहे. तसेच मागण्यांवरील चर्चेसाठी पुढच्या महिन्यात चंडीगड येथे निमंत्रित केले आहे.

जगजीत सिंग डल्लेवाल यांनी वैद्यकीय मदत घेण्याचे मान्य केले असले तरी ते उपोषण सुरूच ठेवणार.

# आश्वासनांबाबत केजरीवालांची कबुली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नवी दिल्ली

दिल्ली विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. आम आदमी पक्ष (आप), भाजप आणि काँग्रेससह सर्वच राजकीय पक्षांकडून मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध आश्वासने दिली जात आहेत. यातच आता 'आप'चे प्रमुख आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी जाहीर सभेत निवडणुकीच्या काळात दिलेली आश्वासने पूर्ण करण्यास अपयशी ठरल्याचे म्हटले आहे.

यमुना नदीची स्वच्छता, पिण्यासाठी शुद्ध पाणी उपलब्ध करणे आणि दिल्लीचे रस्ते युरोपीयन रस्त्यांसारखे करणे ही आश्वासने पूर्ण करता आली नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. लक्ष्मीबाई नगर येथील



निवडणुकीच्या रॅलीमध्ये बोलताना केजरीवाल यांनी हे वक्तव्य केले आहे. तसेच, पुन्हा सत्तेत आल्यास दिलेली आश्वासने पूर्ण करणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

प्रचारसभेत बोलताना अरविंद केजरीवाल म्हणाले की, मी माझ्या आश्वासनांच्या प्रती खरा आहे. एकतर मी दिलेली आश्वासने पूर्ण करेल. नाही तर मी आश्वासने पूर्ण करू शकलो नाही याची आठवण करून देईल. यमुना नदी स्वच्छ करणे, नागरिकांसाठी शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करणे आणि दिल्लीचे रस्ते युरोपियन रस्त्यांसारखे करणे, ही आश्वासने पूर्ण करू शकलो नाही. पुन्हा सत्तेत आल्यापासून ५ वर्षांत ही सर्व आश्वासने पूर्ण करणार आहे, असेही ते म्हणाले.

दरम्यान, दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'आप'कडून मतदारांना अनेक आश्वासने देण्यात आली आहेत. 'आप'कडून महिन्याला २०० युनिट मोफत वीज, मोफत पाणी, मोफत उपचार आणि महिलांसाठी बसमध्ये मोफत बस प्रवास अशा घोषणा करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री महिला सन्मान योजनेंतर्गत महिलांना दरमहिना २१०० रुपये दिले जातील. तसेच, संजीवनी योजनेंतर्गत ६० वर्षांपुढील नागरिकांना मोफत उपचाराची सुविधा देण्यात येईल, अशी घोषणा 'आप'ने केली आहे.

# स्टॅलिन यांचा विरोध कायम

## एक देश एक निवडणूक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** तामीळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे प्रमुख एम.के.स्टॅलिन यांनी एक देश, एक निवडणूक या प्रस्तावाला असणारा विरोध आणखी तीव्र केला. तसेच, भाजपच्या मित्रपक्षांनी आणि लोकशाहीवादी शक्तींनी संबंधित प्रस्तावाला विरोध करावा, असे आवाहनही केले. द्रमुकच्या विधी शाखेच्या परिषदेत स्टॅलिन बोलत होते.

भाजपला देशात एकपक्षीय राजवट आणायची आहे. त्यामुळे त्या पक्षाच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने आणलेल्या प्रस्तावाला विरोध करण्याची गरज आहे. एक धर्म, एक भाषा, एक संस्कृती असे भाजपचे उद्दिष्ट आहे. त्यामुळेच देशावर एकत्रित निवडणुका लादण्याचे प्रयत्न होत आहेत. केंद्रात एक सरकार आणण्याच्या उद्देशातून



राज्यांना उद्ध्वस्त करण्याची भाजपची इच्छा आहे.

एकत्रित निवडणुकांमुळे एका व्यक्तीलाच अधिकार बहाल होतील. ती बाब भाजपसाठीही चांगली नसेल. संबंधित प्रस्तावामुळे एखाद्या व्यक्तीला हुकूमशहा बनवणे शक्य होईल. पण, ते लोकशाहीसाठी चांगले लक्षण नसेल, असे स्टॅलिन म्हणाले. इतर नेत्यांनी एक देश, एक निवडणूक म्हणजेच एकत्रित निवडणुकांचा प्रस्ताव घटनाबाह्य असल्याची भूमिका मांडली. संबंधित प्रस्तावाचे भाजपकडून जोरदार समर्थन केले जात आहे. मात्र, बहुतांश विरोधी पक्षांनी प्रस्ताव मान्य नसल्याचे स्पष्ट केले आहे.

# धर्मादाय मदत

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**अलोआ** किंग चार्ल्स तिसरे, यांनी क्लॅकमननशायर, ॲलोआ येथील एका धर्मादाय संस्थेला भेट दिली, तसेच त्यांच्यासाठी मदतीचा हात पुढे केला.

# धनंजय मुंडेंचा पत्ता कट

**शिर्डी :** अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांचा पालकमंत्रिपदावरुन पत्ता कट करण्यात आलाय. बीडचे पालकमंत्री पद हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडं देण्यात आलंय. मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील प्रमुख संशयित आरोपी असलेल्या वाल्मिक कराड याच्यामुळं धनंजय मुंडेंवर आज ही नामुष्की ओढावल्याचं बोललं जातंय. दरम्यान, यावरच आता धनंजय मुंडेंनी प्रतिक्रिया दिली आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिर्डीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन दिवसीय नवसंकल्प शिबिर पार पडले. या शिबिराला धनंजय मुंडे उपस्थिती राहणार नसल्याची जोरदार चर्चा सुरू होती. मात्र, आज शिबिराच्या समारोपाच्या दिवशी मुंडे यांनी हजेरी लावली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद



साधला. ते म्हणाले, "राजकारण आणि समाजकारण करत असतांना अधिक ऊर्जा मिळावी यासाठी साईबाबांपुढं नतमस्तक होणं गरजेचं आहे." यावेळी पालकमंत्रिपदासंदर्भात विचारण्यात आलं असता ते म्हणाले की, "बीडची सध्याची परिस्थिती पाहता मी स्वतःचं मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती की, बीडचं पालकमंत्री पद अजित पवारांना देण्यात यावं. अजित दादा पुणे जिल्ह्याप्रमाणे बीडचा विकासदेखील करतील", असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# हत्ती जाणार सुट्टीवर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**गडचिरोली :** मेळघाट किंवा गडचिरोली येथे पर्यटकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील हत्तींना पुढील काही दिवस हिवाळी सुट्टीवर पाठवण्यात येणार आहे. त्यामुळे याकाळात गडचिरोली येथे हत्ती पहायला जाणाऱ्यांना हत्ती न दिसण्याचा अंदाज दिला जात आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील कमलापूर येथील सरकारी 'हत्ती छावणी' मध्ये सध्या नऊ हत्ती कार्यरत आहेत. बसंती, रूपा, अजित, मंगला, राणी, प्रियंका, गणेश, लक्ष्मी, कुसुम. तथापि, या नऊ हत्तींना २० जानेवारी ते २९ जानेवारी पर्यंत रजेवर पाठवण्यात येत आहे. त्यामुळे 'हत्ती छावणी' दहा दिवसांसाठी बंद राहणार आहे. तर दुसरीकडे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत कोळकास येथील हत्तींना १० जानेवारी ते २५ जानेवारी अशा १५ दिवसांच्या वैद्यकीय सुट्टीवर पाठवण्यात आले असून या काळात हत्ती सफारी बंद असणार आहे.

**सुट्टीमागचे कारण काय?**

हत्तींसाठी हा वार्षिक विशेष वैद्यकीय रजेचा काल असतो. जानेवारीच्या थंडीत त्यांच्या पायांना भेगा पडू नये यासाठी त्यांच्या पायांवर विशेष उपचार केले जाते. ज्याला चोपिंग असे म्हणतात. चोपिंगमध्ये हत्तींच्या पायांना ४० ते ४५ औषधी वनस्पतींचं मिश्रण लावण्यात येतं. दहा दिवस हत्ती डॉक्टरांच्या देखरेखी खाली असतात. त्यांच्या पायांना अधिकाधिक विश्रांती मिळावी असा उद्देश असल्याने त्यांना फारशी हालचाल करू दिलं जात नाही.

# कोलकाता प्रकरणी संजय रॉय दोषी

## न्यायालय आज सुनावणार शिक्षा

**या प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने काहीही केले नाही, असा आरोप आर. जी. कार रुग्णालयातील बलात्कार आणि खून प्रकरणातील विद्यार्थिनीच्या पालकांनी केला. त्यामुळे आरोपीला दोषी ठरवून समाधानी होण्याचा प्रश्नच येत नाही. आम्ही उच्च आणि सर्वोच्च न्यायालयापुढे अनेक प्रश्न उपस्थित केले होते.**

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** कोलकाता येथील आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमधील ३१ वर्षीय प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार आणि खून प्रकरणी शनिवारी (दि. १८) सियालदह न्यायालयाने मुख्य आरोपी संजय रॉय याला दोषी ठरवले. त्याला सोमवारी २० जानेवारी रोजी शिक्षा सुनावली जाईल, असे न्यायालयाने म्हटले आहे. या खटल्याच्या ५७ दिवसांनंतर सियालदह अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश अनिर्बान दास यांच्या न्यायालयाने निकाल दिला. दरम्यान, निकाल सुनावणीवेळी मुख्य आरोपी




संजय रॉय याला न्यायालयात आणले होते. येथील आर. जी. कार रुग्णालयात प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार झाला त्यावेळी आपल्या मित्रांसोबत संजय रॉय वेश्यावस्तीत गेला होता. मात्र, तेथे त्याने काही केले नव्हते. त्यावेळी जाताना त्याने रस्त्यात एका मुलीचा विनयभंग केला होता, असे त्याच्या लाय डिटेक्टर टेस्टमध्ये त्याने सांगितले होते, अशी माहिती सीबीआय अधिकाऱ्यांनी दिली. नंतर चार वाजून तीन मिनिटांनी तो रुग्णालयात आला. तेथून तो सेमिनार हॉलच्या कॉरिडोरमध्ये आला. त्यावेळी त्याने प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार केल्याचा गंभीर गुन्हा केल्याचा त्याच्यावर आरोप आहे.

> कोलकाता पोलिसांनी पाच दिवस या प्रकरणाचा तपास केला. त्या काळात पुराव्यांमध्ये फेरफार केली असण्याची शक्यता आहे. कडक शिक्षा केली जावी. या घटनेने प. बंगालमधील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती चांगली नसल्याचे स्पष्ट होते,
> —सुकांता मुजुमदार, केंद्रीय मंत्री

या प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने काहीही केले नाही, असा आरोप आर. जी. कार रुग्णालयातील बलात्कार आणि खून प्रकरणातील विद्यार्थिनीच्या पालकांनी केला. त्यामुळे आरोपीला दोषी ठरवून समाधानी होण्याचा प्रश्नच येत नाही. आम्ही उच्च आणि सर्वोच्च न्यायालयापुढे अनेक प्रश्न उपस्थित केले होते. आम्हाला त्याची उत्तरे न्यायालयाकडून अपेक्षित होती. त्यांनी सीबीआयकडे सारे उत्तरदायित्व दिले, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

या गुन्ह्यात एकापेक्षा अधिक लोकांचा सहभाग असावा आणि पुराव्यात हेरफार झाली असण्याचा संशय अनेक जण व्यक्त करत आहेत. न्यायालयाने त्याला दोषी ठरवले आहे.



भारताचा संघ मजबूत दिसत आहे. रोहित भारताला विजयापर्यंत नेईल, असा मला विश्वास आहे, पण सूर्याला संघातून वगळण्यात आल्याने मला आश्चर्य वाटत आहे. भारताला त्या एक्स-फॅक्टरची उणीव भासेल आणि तीही मधल्या फळीत. तो मैदानभर धावा करतो. म्हणूनच त्याला मिस्टर ३६० म्हणतात. तो पुढे म्हणाला, सूर्या शानदार स्वीप शॉट्स खेळतो आणि तो गेम चेंजर खेळाडू आहे. तो संघात असायला हवा होता. मला वाटते शुभमन हा भारताचा पुढचा सुपरस्टार आहे. त्याने एकदिवसीय सामन्यांमध्ये चांगली कामगिरी केली आहे. जेव्हा तुम्ही एखाद्या तरुणाला एवढी चांगली संधी देता, तेव्हा ते त्याच्या क्षमतेबद्दल मोठ्या प्रमाणावर बोलते. पुढचा नेता कोण असेल हे रोहित शर्माला स्पष्टपणे माहीत आहे. शुभमन हा चांगल्या कर्णधारांपैकी एक आहे, विशेषत: ज्या प्रकारे त्याने आयपीएलमध्ये गुजरात संघाचे नेतृत्व केले. — सुरेश रैना

# भारताने वेस्टइंडिजला हरविले

## अंडर-१९ महिला विश्वचषक २०२५ : ४.२ षटकांत गाठले लक्ष्य

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**क्वालालंपूर :** १९ वर्षांखालील महिला टी२० वर्ल्ड कप स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत रविवारी १९ वर्षांखालील भारतीय महिला संघाचा सामना वेस्ट इंडिजविरुद्ध झाला. क्वालालंपूर येथे झालेल्या या सामन्यात भारताने १९ वर्षाखालील वेस्ट इंडिज महिला संघाला ९ विकेट्सने पराभूत करत स्पर्धेची मोहिम विजयाने सुरू केली. या संपूर्ण सामन्यात भारतीय महिला संघांचे वर्चस्व दिसून आले.

वेस्ट इंडिजने भारतासमोर विजयासाठी अवघ्या ४५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग भारतीय संघाने १ विकेट गमावत ४.२ षटकात म्हणजेच अवघ्या २६ चेंडूत केला.

भारताकडून गोंगाडी त्रिशा आणि जी कमालिनी यांनी डावातील सुरुवात केली. पण पहिल्या चेंडूवर चौकार मारल्यानंतर गोंगाडी त्रिशा दुसऱ्या चेंडूवर बाद झाली. परंतु, त्यानंतर कामिलीनीला सानिका चाळकेची साथ मिळाली.

त्या दोघींनी मिळून भारताचा विजय पाच षटके पूर्ण होण्यापूर्वीच निश्चित केला. कामिलीने १३ चेंडूत नाबाद १६ धावा केल्या, तर सानिका चाळकेने ११ चेंडूत नाबाद १८ धावा केल्या. दोघींनीही प्रत्येकी ३ चौकार मारले. वेस्ट इंडिजकडून त्रिशाची एकमेव विकेट झाहझरा क्लाक्सटनने घेतली.

तत्पुर्वी भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय गोलंदाजांनी योग्य ठरवला. चौथ्याच षटकात वेस्ट इंडिजची कर्णधार समारा रामनाथला व्ही जे जोशिथाने ३ धावांवर बाद केले. त्याच्या पुढच्याच चेंडूवर तिने नायजनी कंबरबॅचला शून्यावर माघारी धाडले. पुढच्याच षटकात झाहझरा क्लाक्सटनही शून्यावर बाद झाली, तर त्यानंतर फलंदाजीला आलेल्या ब्रियान्ना हॅरीचरनलाही धावा करता आल्या नाहीत.

८ व्या षटकात एक बाजू लढवत ठेवलेली साबी कॅलेंडर १२ धावांवर धावबाद झाली. नंतर कनिका कॅसरने थोडीफार झुंज दिली.

पण अबीगईल ब्रायस आणि एमिहा गिल्बर्ट प्रत्येकी १ धावा करून बाद झाल्यानंतर ती देखील १२ व्या षटकात १५ धावांवर बाद झाली. शेवटी १३ व्या षटकात क्रिस्टन सदरलँडला आयुषी शुक्लाने शून्यावर, तर १४ व्या षटकात सीलेना रॉसला परुनिका सिसोदीयाने शून्यावर बाद करत वेस्ट इंडिजचा डाव संपवला. वेस्ट इंडिजला १३.२ षटकात सर्वबाद ४४ धावा करता आल्या.

### गुणतालिकेत भारत अव्वल...

- पहिला सामना जिंकून भारताने अ गटातील गुणतालिकेतही पहिले स्थान मिळवले आहे. श्रीलंकेचेही भारताच्या बरोबरीचे २ गुण आहेत, मात्र उत्तम धावगतीमुळे भारतीय महिला संघ पहिल्या क्रमांकावर आहे. संघाचा दुसरा सामना आता २१ जानेवारीला क्वालालंपूर येथे घरच्या संघ मलेशियाशी होणार आहे. संघ २३ जानेवारीला श्रीलंकेविरुद्ध तिसरा सामना खेळणार आहे.
- या स्पर्धेत १६ संघ सहभागी होत आहेत. प्रत्येकी ४ संघांची ४ गटात विभागणी करण्यात आली. प्रत्येक गटातील टॉप ३-३ संघ सुपर-६ फेरीत जातील. येथे ६-६ संघांची २ गटात विभागणी केली जाईल. त्यानंतर प्रत्येक गटातील २-२ अव्वल संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील. फायनल २ फेब्रुवारीला होणार आहे.


## 'विराटने इंग्लंडविरुद्धच्या मालिकेपूर्वी काऊंटी क्रिकेट खेळावे'

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** टीम इंडियाचा माजी फलंदाज संजय मांजरेकर यांनी फॉर्ममध्ये नसलेल्या विराट कोहलीला इंग्लंडमधील कसोटी मालिकेपूर्वी महत्त्वाचा सल्ला दिला आहे. संजय मांजरेकरांच्या मते विराटने गती मिळवण्यासाठी इंग्लिश काउंटी चॅम्पियनशिपमध्ये खेळावे. भारत आणि इंग्लंड यांच्यात जून-जुलैमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका होणार असून नुकत्याच न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेतील निराशाजनक कामगिरीनंतर विराट कोहली आपल्या खेळात सुधारणा करण्यासाठी उत्सुक आहे.

'स्टार स्पोर्ट्स'च्या 'डीप पॉइंट पॉडकास्ट'मध्ये संजय मांजरेकरने भारतीय संघाला इंग्लंड दौरा सुरू होण्यापूर्वी तेथील परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी कसोटी क्रिकेटचा सराव करण्याचा सल्ला दिला आहे. संजय मांजरेकर म्हणाले, "कोहलीला भरपूर कसोटी क्रिकेट खेळण्याची गरज आहे. इंग्लंडमध्ये पहिली कसोटी जूनमध्ये आहे, तर काउंटी चॅम्पियनशिप एप्रिलमध्ये सुरू होईल.

## खेलरत्न मनु भाकरच्या कुटुंबावर कोसळला दु:खाचा डोंगर





**नवी दिल्ली :** पॅरिस ऑलिम्पिकमधील पदक विजेती मनु भारकरला नुकतेच मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पण आता मनु भाकरच्या कुटुंबावर दुखःचा डोंगर कोसळला आहे. रविवारी मनुच्या कुटुंबातील दोन सदस्यांचा रस्ते अपघातामध्ये मृत्यू झाला आहे. चरखी दादरीमधील महेंद्रगड रोडवर हा अपघात झाला. ज्यामध्ये मनूच्या मामा व आजीला आपला जीव गमवावा लागला आहे. मनूचे मामा व आजी स्कूटीवरून प्रवास करत असताना ब्रेझा कारनेने त्यांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भयंकर होती की दोघांचाही जागीच मृत्यू झाला. पोलिसांना माहिती मिळताच घटनास्थळी पोहचले व आता दोघांचा मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आला आहे. पोलिस घटनास्थळी दाखल होईपर्यंत कार चालक पसार झाला होता.पोलिसांनी कार चालकाचा तपास सुरू केला आहे.

## शाकिब अल हसन विरोधात अटक वॉरंट जारी

**नवी दिल्ली :** बांगलादेशी क्रिकेटपटू शाकिब अल हसन पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. शाकिब विरोधात



अरेस्ट वॉरंट निघाले आहे. आयएफआयसी बँकेचा चेक बाउंस झाल्याप्रकरणी ढाका न्यायालयाने हे अटक वॉरंट जारी केले आहे. याआधी देखील अवामी लीगचे माजी खासदार शाकिबच्या विरोधात अटक वॉरंट निघाले होते. विद्यार्थी आंदोलनादरम्यान एका खूनाच्या आरोपाखाली शाकिबवर गुन्हा दाखल झाला होता. ढाका न्यायालयाचे अतिरिक्त मुख्य मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट झियादुर रहमान यांनी रविवारी हा आदेश जारी केला. १५ डिसेंबर रोजी चेक फसवणूक प्रकरणात शाकिबचे नाव आले होते. त्यानंतर १८ डिसेंबर रोजी न्यायालयाने त्यांना प्राथमिक सुनावणीनंतर १९ जानेवारी रोजी हजर राहण्याचे आदेश दिले. IFIC बँकेचे रिलेशनशिप ऑफिसर, शाहीबुर रहमान यांनी बँकेच्या वतीने खटला दाखल केला, शाकिब आणि इतर तिघांवर दोन वेगवेगळ्या चेकद्वारे BDT ४,१४,५७,००० (अंदाजे ४१.४ दशलक्ष रुपये) चेक बाउंस केल्याचा आरोप केला.

## आंतर आयटी महिला क्रिकेट स्पर्धेत

# कॅपजेमिनी, डॉइश बँक, इन्फोसिस संघ विजयी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** आयडियाज- अ- सास कंपनी यांच्या तर्फे व कोलते पाटील डेव्हलपर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाचव्या अंकुर जोगळेकर मेमोरियल आंतर आयटी महिला क्रिकेट स्पर्धेत कॅपजेमिनी, डॉइश बँक, इन्फोसिस या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सलामी दिली.

व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अकादमी येथील मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत कल्याणी कुलकर्णी(३-१२)हीने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर कॅपजेमिनी संघाने कॉग्निझंट संघाचा 41धावांनी पराभव करून विजयी सुरुवात केली. दुसऱ्या सामन्यात रुबल महेश्वरी २-४ व १२) हिने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर डॉइश बँक संघाने डसॉल्ट सिस्टिम्स संघाचा ५ गडी राखून पराभव करत शानदार सुरुवात केली. अन्य लढतीत श्रीजा जोनगावकर( नाबाद ७३), वैष्णवी गाडगीळ नाबाद (७१) यांनी केलेल्या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर इन्फोसिस संघाने टेक महिंद्रा संघाचा १३४ धावांनी पराभव करून सुरेख सुरुवात केली. स्पर्धेचे उद्‌घाटन आयडियाज- अ- सास कंपनीच्या वित्तीय विभागाच्या प्रमुख मल्लिका जेम्स, कोलते पाटील डेव्हलपर्स चे सोमेश राठोड व अक्षय पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

# शरयू रांजणेचा विजयी चौकार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शरयू रांजणे हिने पीवायसी एचटीबीए अमनोरा कप जिल्हा मानांकन सुपर-५०० बॅडमिंटन स्पर्धेत चार गटांत विजेतेपद पटकावले. तिने १७ वर्षांखालील मुलींच्या एकेरी, मुलींच्या दुहेरीचे, मिश्र दुहेरी आणि १५ वर्षांखालील मुलींच्या एकेरीचे विजेतेपद पटकावले.



पीवायसी हिंदू जिमखाना येथे ही स्पर्धा सुरू आहे. स्पर्धेतील १७ वर्षांखालील मुलींच्या एकेरीच्या अंतिम फेरीत शरयूने सोयरा शेलारला २१-१६, २१-१३ असे नमविले. यानंतर शरयूने मिश्र दुहेरीच्या अंतिम फेरीत ओजस जोशीच्या साथीने अग्रमानांकित देवांस सकपाळ- सफा शेख जोडीला २१-१७, २१-१२ असे पराभूत करून जेतेपद पटकावले. शरयूने १५ वर्षांखालील मुलींच्या एकेरीत सोयरा शेलारला २१-१४, २१-४ असे पराभूत करून तिहेरी यश मिळवले. यानंतर १७ वर्षांखालील मुलींच्या दुहेरीत शरयूने सोयरा शेलारच्या साथीने बाजी मारली. या जोडीने अंतिम फेरीत जुई जाधव-सफा शेख जोडीचे आव्हान २१-६, १६-२१, २१-१७ असे परतवून लावले.

चिन्मय फणसेने १५ वर्षांखालील मुलांच्या एकेरी आणि दुहेरीचे विजेतेपद पटकावले. चिन्मयने एकेरीच्या अंतिम फेरीत माधव कामतला २१-१४ २१-१२ असे नमविले. यानंतर चिन्मय फणसेने सायजी शेलारच्या साथीने दुहेरीचे जेतेपद पटकावले. चिन्मय-सायजीने हृदान पाडवे- विहान कोल्हाडे जोडीवर २१-१७, २१-१४ अशी मात करून जेतेपद पटकावले. जतिन सराफने १३ वर्षांखालील मुलांच्या एकेरीचे आणि १५ वर्षांखालील मिश्र दुहेरीचे जेतेपद पटकावले. दुहेरीच्या अंतिम फेरीत जतिन सराफने कायरा रैनाच्या साथीने सायजी शेलार-तेजस्वी भुतडा जोडीवर २२-२०, २१-१७ असे नमविले. यानंतर जतिनने १३ वर्षांखालील मुलांच्या एकेरीत खुश दीक्षितला २१-९, २१-९ असे सहज पराभूत करून दुहेरी मुकुट मिळवला. कायरानेही दुहेरी यश मिळवले. तिने १५ वर्षांखालील मिश्र दुहेरीच्या जेतेपदानंतर १३ वर्षांखालील मुलींच्या एकेरीचे जेतेपद पटकावले. अंतिम फेरीत तिने गार्गी कामठेकरला २१-९, २१-१२ असे पराभूत केले. हर्षद भागवतने स्पर्धेत ४० वर्षांखालील पुरुष एकेरी आणि ३५ वर्षांखालील पुरुष एकेरीचे विजेतेपद पटकावले.

## पंतला लखनऊचे कर्णधारपद मिळणार, लवकरच घोषणा

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२५ पूर्वी ऋषभ पंत लखनऊ सुपर जायंट्स (एलएसजी) चा कर्णधार बनणार आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरच्या मेगा



लिलावात पंत आयपीएलचा सर्वात महागडा खेळाडू ठरला, त्याला एलएसजी ने २७ कोटी रुपयांना (सुमारे ३.२१ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) विकत घेतले. भारताचा यष्टिरक्षक-फलंदाज केएल राहुल त्याच्या पहिल्या तीन सत्रांसाठी (२०२२ पासून) एलएसजीचे नेतृत्व करतो. या संघाने पहिल्या दोन वर्षांत प्ले-ऑफमध्ये प्रवेश केला, मात्र तो अंतिम फेरीत पोहोचू शकला नाही. २०२४ चा हंगाम खूपच खराब होता, संघ सातव्या स्थानावर होता. पंतसाठी एलएसजी हा आयपीएलमधील दुसरा संघ आहे. यापूर्वी त्याने २०१६ मध्ये दिल्ली कॅपिटल्समधून आयपीएलमध्ये कारकिर्दीची सुरुवात केली होती. त्यावेळी, डेअरडेव्हिल्सने (दिल्ली कॅपिटल्सचे पूर्वीचे नाव) २०१६ च्या लिलावात त्याला १.६ कोटी रुपयांना विकत घेतले होते. पंतने दिल्ली कॅपिटल्सचे नेतृत्वही केले आहे. त्याला २०२१ मध्ये कर्णधार बनवण्यात आले. दुखापतीमुळे तो २०२२ मध्ये आयपीएलपासून दूर राहिला होता. २०२३ मध्येही तो दिल्लीचा कर्णधार राहिला.

## क्रिकेट लीग २०२५ स्पर्धेत बेलवलकर बॉबकॅट्स, पायरेटस, रांजेकर देवगावकर लायन्स संघांचे विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या वतीने अकराव्या पीवायसी- पुसाळकर प्रीमियर लीग क्रिकेट २०२५ स्पर्धेत साखळी फेरीत बेलवलकर बॉबकॅट्स, पायरेटस, सेनुमेरो हिबुटी चिताज,रांजेकर देवगावकर लायन्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.



पीवायसी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत गौतम मलकर्णेकर ६० धावांच्या अफलातून खेळीच्या जोरावर सेनुमेरो हिबुटी चिताज संघाने ट्रूस्पेस नाईट्स संघाचा २५ धावांनी पराभव करून तिसरा विजय मिळवला. प्रेरित गोयल १-२) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर पायरेटस संघाने नॉक ९९ पुणेरी बाप्पा संघाचा ६ गडी राखून पराभव केला.

काल रात्री उशिरा झालेल्या लढतीत ओजस साबडे(२२धावा व २-५) याने केलेल्या सुरेख अष्टपैलू खेळीच्या जोरावर बेलवलकर बॉबकॅट्स संघाने पंडित जावडेकर डॉल्फिन्सचा ७ गडी राखून पराभव केला.

हर्षा जैन नाबाद ६० धावा व १-१५) याने केलेल्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर रांजेकर देवगावकर लायन्स संघाने लाइफसायल स्नो लेपर्ड्स संघाचा ४२ धावांनी पराभव केला. आत्मन बागमार नाबाद ८८ धावांच्या खेळीच्या जोरावर नॉक ९९ पुणेरी बाप्पा संघाने रावेतकर बुल्स संघाचा ३६ धावांनी पराभव करून आगेकूच केली.

## कर्नाटकने पाचव्यांदा विजय हजारे ट्रॉफी जिंकली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**वडोदरा :** कर्नाटकने पाचव्यांदा विजय हजारे ट्रॉफीचे विजेतेपद पटकावले. या संघाने रविवारी पहिल्यांदाच अंतिम सामना खेळणाऱ्या विदर्भाचा ३६ धावांनी पराभव केला. वडोदरात प्रथम फलंदाजी करताना कर्नाटकने ६ गडी गमावून ३४८ धावा केल्या. प्रत्युत्तरात विदर्भाला केवळ ३१२ धावा करता आल्या.

या मोसमात ५ शतके झळकावणारा विदर्भाचा कर्णधार करुण नायरला केवळ २७ धावा करता आल्या. सलामीवीर ध्रुव शौरीने शतक झळकावले, पण तो आपल्या संघाला विजयापर्यंत नेऊ



शकला नाही. कर्नाटककडून मधल्या फळीतील फलंदाज रविचंद्रन स्मरणाने १०१ धावांची खेळी केली. संघाकडून प्रसिध कृष्णा, वासुकी कौशिक आणि अभिलाष शेट्टी यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले. कोटंबी स्टेडियमवर विदर्भाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी निवडली. कर्नाटकची सुरुवात खराब झाली.

## रविंद्र जडेजा रणजी सराव सत्रात सामील झाला

**नवी दिल्ली :** भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा देशांतर्गत ड्युटीवर परतला आहे. त्याने रविवारी सकाळी सौराष्ट्र संघासोबत रणजी सराव सत्रात भाग घेतला. जडेजा सराव सत्रात सामील झाल्यामुळे रणजी ट्रॉफी २०२४-२५ च्या दुसऱ्या टप्प्यात तो सौराष्ट्रकडून खेळू शकतो असा अंदाज वर्तवला जात आहे. २३ जानेवारीला राजकोटच्या निरंजन शाह स्टेडियमजवळील ग्राउंड सी येथे सौराष्ट्राचा सामना दिल्लीशी होणार आहे. सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या (एससीए) अधिका-यांकडून अद्याप तो खेळणार की नाही याबाबत कोणतेही वक्तव्य आलेले नाही, मात्र तो खेळण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे. जडेजाने जानेवारी २०२३ मध्ये शेवटचा रणजी सामना खेळला होता, त्याने चेन्नईमध्ये तमिळनाडूविरुद्ध सौराष्ट्राचे नेतृत्व केले होते. इंग्लंडविरुद्धची एकदिवसीय मालिका आणि चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी बीसीसीआयने शनिवारी टीम इंडियाची घोषणा केली. मुंबई वानखेडे स्टेडियमवर, निवडकर्ता अजित आगरकर आणि कर्णधार रोहित शर्मा यांनी १५ सदस्यीय भारतीय संघाची नावे जाहीर केली. ४ अष्टपैलू खेळाडूंना संघात ठेवण्यात आले आहे. त्यात रवींद्र जडेजाचेही नाव आहे.

## पाकिस्तानने मुल्तान टेस्ट १२७ धावांनी जिंकली; साजिद खानने घेतल्या ९ विकेट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुलतान :** २ सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात पाकिस्तानने वेस्ट इंडिजचा १२७ धावांनी पराभव केला. मुल्तानच्या फिरकी अनुकूल विकेटवर हा कमी धावसंख्येचा सामना होता. रविवारी तिसऱ्या दिवशी २५१ धावांच्या प्रत्युत्तरात वेस्ट इंडिजचा दुसरा डाव १२३ धावांवर आटोपला.

सामनावीर ठरलेल्या साजिद खानने एकूण ९ विकेट घेतल्या. पहिल्या डावात ४ आणि दुसऱ्या डावात ५ विकेट्स घेतल्या. ६ कॅरेबियन फलंदाजांना दुसऱ्या डावात दुहेरी आकडाही गाठता आला नाही.



तत्पूर्वी, पाकिस्तानचा डाव १५७ धावांवर आटोपला. पहिल्या डावात ९३ धावांची आघाडी घेत संघाने वेस्ट इंडिजसमोर २५१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. संघाकडून जोमेल वॅरिकनने ७ बळी घेतले.

सामन्याच्या दुसऱ्या दिवशी पाकिस्तानला पहिल्या डावात २३० धावा करता आल्या. तर वेस्ट इंडिजचा संघ १३७ धावांवर बाद झाला. ज्यामध्ये पाकिस्तानकडून फिरकीपटू नोमान अलीने ५ विकेट घेतल्या. मालिकेतील दुसरा सामना २५ जानेवारीपासून मुल्तानमध्ये खेळवला जाणार आहे.

वेस्ट इंडिजचा दुसरा डाव फिरकीपटूंसमोर टिकू शकला नाही. संघाकडून अलिक अथनाजेने सर्वाधिक ५५ धावा केल्या. कॅरेबियन संघ डावात केवळ ३६.३ षटकेच खेळू शकला. साजिद खानने १५ षटकात ५० धावा देत ५ बळी घेतले. लेगस्पिनर अबरार अहमदने ४ बळी घेतले. नोमान अलीला १ विकेट मिळाली.

## खो-खो विश्वचषकात जेतेपदाच्या दिशेने पाऊल टाकलं

# भारतीय महिलांकडून दक्षिण आफ्रिकेचा पराभव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या खो-खो विश्वचषक २०२५ मध्ये भारतीय महिला संघांने उपांत्य फेरीच्या आजच्या सामन्यात भारताने कमालीच्या खेळाचे प्रदर्शन केले. त्यामुळे भारताचे अंतिम फेरीत पोहचण्याचे स्वप्न सहज शक्य झाले. पहिल्या डावातच भारताने आपले इरादे दाखवून देत प्रतिस्पर्धी द. आफ्रिकेला सळो की पळो करून सोडले. या सामन्यात दोन्ही डावात भारताने प्रत्येकी ५ असे १० ड्रीम रन गुण मिळवत द. आफ्रिकेला



धक्का दिला. आज पुन्हा एकदा प्रियांका इंगळेने (४ गुण) खो-खो विश्वचषकाचे आम्हीच दावेदार आहोत हे दाखवून दिले. पंजाबचेचे राज्यपाल महामहीम गुलाबचंद कटारिया यांनी हा सामना पाहण्याचा आनंद लुटला. भारताने हा सामना ६६-१६ (मध्यंतर ३३-१०) असा ५० गुणांनी जिकला.

भारतीय संघाने सामन्याला दमदार सुरुवात केली. चैत्रा बी. यांच्या अद्वितीय ड्रीम रन मुळे संघाने पहिल्याच टप्प्यात मजबूत पकड मिळवली. नाझिया बिबी आणि निर्मला भाटी यांना दक्षिण आफ्रिकेच्या बचावपटूंनी टिपल्यानंतरही चैत्राने एकटीने ५ गुण मिळवले. मात्र, अखेर सिनेतेंबा मोसिया यांनी तिला बाद केले. या ड्रीम रनने भारताने दक्षिण आफ्रिकेच्या ८ गुणांच्या जवळ जाण्याची तयारी केली.

दुसऱ्या टर्नमध्ये रेश्मा राठोड यांनी आघाडी घेत दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंना बाद करण्यात मोठी कामगिरी केली. त्यांची ही कामगिरी संघासाठी अत्यंत महत्त्वाची ठरली. या टर्ननंतर भारतीय संघ ३३-१० अशा आघाडीवर होता. तिसऱ्या टर्नमध्ये भारतीय महिला संघाने पुन्हा एकदा ड्रीम रन साकारला. वैष्णवी पवार, नसरीन शेख, आणि भिलरदेवी यांनी सलग ५ मिनिटे मैदानावर उत्कृष्ट खेळ करत ५ गुण मिळवले. या टर्न नंतर स्कोअर ३८-१६ असा झाला, ज्यामुळे अंतिम सात मिनिटांमध्ये भारतीय संघाची पकड मजबूत झाली.